शुक्रवार, २२ सप्टेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ५१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 22 SEPT. 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | YEAR-03 • ISSUE-51 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-12 • PRICE-5

## गौराई आली घरा...



गौराई आली माझ्या घरा... तिच्या पूजनाची तयारी करा... आगमनाचा सोहळा खरा...हा आनंद साजरा करा... छायाचित्र : महेश निलंगेकर बीड

# नाशिक जिल्ह्यात दुसऱ्या दिवशीही लिलाव बंदच

## संपकरी व्यापाऱ्यांवर कार्यवाहीचे पणन खात्याचे निर्देश

आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड : विविध मागण्यांसाठी दि.२० पासून नाशिक जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी कांदा लिलावात भाग न घेण्याच्या निर्णयाने नाशिक जिल्ह्यातील कांद्याचे लिलाव सलग दुसऱ्या दिवशीही ठप्प आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे पणन खात्याने बंदमध्ये सहभागी होणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने आणि गाळे जप्त करावे असे बाजार समित्यांना निर्देश दिले आहेत. बाजार समित्यांनी आज दि.२१ दुपारी १ वाजेपर्यंत कार्यवाहीचा अहवाल राज्य सरकारला सादर करायचा आहे. कार्यवाहीत टाळाटाळ केल्यास बाजार समिती संचालक मंडळ व सचिवांना कार्यवाहीस सामोरे जावे लागणार आहे.**

नाशिक जिल्हा कांदा व्यापारी असोसिएशनने आपल्या विविध मागण्यांकरिता मुख्यमंत्री व पणन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मागण्यांबाबतचे निवेदन सादर केलेले आहे. यासंदर्भात नाशिक येथील बैठकीत जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा उपनिबंधक फैयाज मुलाणी, व्यापारी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष खंडू देवरे, कांदा व्यापारी संतोष अट्टल, प्रवीण कदम, ऋषी सांगळे, अतुल शहा, सुरेश बाफना, नवीनकुमार सिंग यांसह पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत जिल्ह्यातील व्यापाऱ्यांच्या मागण्याबाबत कुठलाही सकारात्मक तोडगा न निघाल्याने दिनांक १९ सप्टेंबर पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास दि.२० सप्टेंबर पासून जिल्ह्यातील व्यापारी कांदा लिलावात सहभागी होणार नाही असा इशारा दिला होता. या बैठकीत तोडगा न निघाल्याने बुधवार दि.२० पासून बाजार समित्यांच्या कांदा लिलावात सहभागी न होण्याचा व्यापाऱ्यांनी निर्णय घेतला आहे. त्यामुळे बाजार समित्यांमध्ये शुकशुकाट बघायला मिळत असून यामुळे सुमारे ३० ते ४० कोटी रुपयांचे नुकसान होईल असा अंदाज आहे. कांदा प्रश्नावर पालकमंत्री दादा भुसे यांच्या उपस्थितीत आज दि.२१ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात व्यापारी प्रतिनिधी, बाजार समिती प्रतिनिधी, जिल्हा उपनिबंधक यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यांची बैठक झाली. दि.२६ सप्टेंबर रोजी याबाबत मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात येईल तोपर्यंत व्यापाऱ्यांनी लिलाव सुरु करावेत, असे आवाहन भुसे यांनी केले आहे. मात्र व्यापाऱ्यांनी जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही. तोपर्यंत कांदा लिलाव सुरू होणार नाही अशी भूमिका घेतली त्यामुळे या बैठकीत तोडगा निघाला नाही. जिल्हा निबंधक कार्यालयाने बाजार समित्यांनी शेतमाल खरेदी-विक्रीचे व्यवहार चालू ठेवण्याबाबत तात्काळ पर्यायी व्यवस्था आणि आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

अडेलतट्टू व्यापाऱ्यांचा बाजार समित्यांनी अधिकार वापरून परवाना निलंबित किंवा रद्द करावा, नवीन खरेदीदारांना परवाना देऊन प्रोत्साहित करावे अशा सूचना दिल्या आहेत. ज्या परवानाधारकांचे परवाने निलंबित किंवा रद्द केले आहे, बाजार समितीने त्यांना दिलेले गाळे किंवा भूखंड ताब्यात घ्यावेत अशा सूचना दिल्या आहेत.

काल दि.२० रोजी पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी येवला येथे प्रसारमाध्यमांशी बोलतांना ऐन सणासुदीच्या काळात नाशिक जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी कांदा लिलाव बेमुदत बंद ठेवण्याचा निर्णय अयोग्य असून येत्या दि.२६ तारखेला व्यापाऱ्यांसोबत बैठक घेण्याचे ठरले होते. सहकार आयुक्त आणि नाशिक जिल्हाधिकारी यांना बंदमध्ये सहभागी होणाऱ्या व्यापाऱ्यांचे परवाने आणि गाळे जप्त करण्याचे आदेश दिले होते.



लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीने तब्बल १३१ व्यापाऱ्यांना व ३६ व्यापारी भूखंड व गाळे यांचे लाभार्थी असून त्यांनाही नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. २७ व्यापाऱ्यांनी आपले परवाने बाजार समितीकडे जमा केले आहेत. मात्र व्यापाऱ्यांनी टोकाची भूमिका न घेता लिलावात सहभागी व्हावे यासाठी त्यांचे मन वळविण्याचे प्रयत्न सुरु आहेत, त्याचबरोबर जे कुणी नवीन व्यापारी इच्छुक असतील त्यांना तातडीने परवाने देण्यात येतील.
**बाळासाहेब क्षीरसागर, सभापती, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती**

व्यापारी त्यांच्या मागण्या व संपावर ठाम आहेत. त्यांना कार्यवाहीची नोटीस देऊनही फरक पडलेला नाही. नवीन व्यापारी परवान्यासाठी अद्यापही अर्ज आलेले नाहीत. त्यामुळे बाजार समित्या बंदच राहतील अशी शंका आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी नाफेडने तातडीने लिलावात सहभागी होऊन लिलाव सुरु करावेत व कांदा उत्पादकांना दिलासा द्यावा. **डॉ. श्रीकांत आवारे, संचालक, लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती.**

विविध मागण्यांसाठी कांदा व्यापाऱ्यांनी लिलावात न उतरण्याचा निर्णय घेतला आहे. तो योग्य आहे त्याला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा पाठिंबा आहे. मात्र कांदा नाशवंत असल्याने आंदोलन जास्त दिवस सुरु राहिल्यास शेतकऱ्यांचा कांदा सडून ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे हे आंदोलन जास्त न ताणवता एक दोन दिवस ठीक आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या मालाचे लिलाव बंद ठेवायचे व या काळात व्यापाऱ्यांनी बाहेर माल पाठवून जास्त नफा कमवायचा हे स्वाभिमानी शेतकरी संघटना सहन करणार नाही. व्यापारी बाहेर माल पाठवताना आढळल्यास संघटनेच्यावतीने गाड्या आडवल्या जातील. **संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

## चंद्रपुरात मुसळधार पावसात ओबीसी सेवा संघाचे ‘भीक मांगो’ आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ओबीसी, व्हीजे एनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी ७२ ओबीसी वसतिगृह, आधार योजना, विदेश शिष्यवृत्ती या मागण्यांसाठी गांधी चौक येथे ओबीसी सेवा संघतर्फे मुसळधार पावसात भीक मांगो सत्याग्रह करण्यात आले. मागील ६ वर्षांपासून ओबीसी विद्यार्थ्यांच्या ७२ वसतिगृहांचा विषय शासनाने अजूनही सोडवला नाही. राज्य शासनाचा वित्त विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग गंभीर नाही. यामुळे ओबीसी विद्यार्थी वसतिगृहे आणि आधार योजनेपासून वंचित आहेत. अनेक विद्यार्थ्यांनी वसतिगृह सुरू होतील या आशेने जिल्ह्याच्या ठिकाणी प्रवेश घेतला आहे. मात्र अजूनही वसतिगृह सुरू झाले नाही. विद्यार्थ्यांना मिळेल ते काम करून शिक्षण घ्यावे लागत आहे. शाळा महाविद्यालये सुरू होऊन ३ महिने उलटले आहेत तरी ७२०० विद्यार्थ्यांसाठी ७२ ओबीसी वसतिगृहे, २१६०० विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले आधार योजना, ७५ विद्यार्थ्यांसाठी विदेश शिष्यवृत्ती योजना यावर निर्णय झालेला असताना अजूनही वरील योजना शासनाने सुरू केल्या नाहीत. वरील योजना महाराष्ट्र शासनाच्या वित्त व बहुजन कल्याण विभागाने अडवून ठेवल्या आहेत. चालढकल करत शासन ओबीसी समाजावर अन्याय करत आहे. त्यामुळे या सर्व बाबींचा निषेध करण्यासाठी भीक मांगो सत्याग्रहाच्या माध्यमातून सरकारसाठी भीक मागितली व मिळालेली भीक सरकारला पाठविण्यात आली. याची दखल घेऊन सरकारने न्याय द्यावा अन्यथा तीव्र आंदोलन करू असा इशारा जिल्हाध्यक्ष प्रा.अनिल डहाके यांनी दिला.

# पुणे बंगळुरू महामार्ग रोखला; धनगर आरक्षणासाठी समाज रस्त्यावर

## मोर्चात घोडे, बकरी, मेंढ्यांना घेऊन गजी नृत्यांनी लक्ष वेधले

आधुनिक केसरी न्यूज

हेमंत धायगुडे


खंडाळा : खंडाळ्यात आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाजाने विराट मोर्चा काढत पुणे-बंगळुरू महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. धनगर समाजाला अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण मिळावे व तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी हजारो समाज बांधव विराट मोर्चात सहभागी झाले.

मोर्चाची सुरवात खंडाळा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून करण्यातआली.घोडे, बकरी,मेंढ्यांना घेऊन पारंपारिक पद्धतीचे गजीनृत्य सादर करीत विराट मोर्चाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.खंडाळा तहसील कार्यालयाजवळ यशवंतराव चव्हाण व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करून खंडाळा शहरात मोर्चा महामार्गाकडे मार्गस्थ झाला. यावेळी मोर्चात धनगर समाजाच्या वतीने 'अहिल्यादेवी होळकर यांचा विजय असो', 'येळकोट येळकोट जय मल्हार', 'आरक्षण आमच्या हक्काचं नाही, कुणाच्या बापाचं' या घोषवाक्याने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. महामार्गावर रास्ता रोको केल्याने रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. महामार्गावरील दोन्ही बाजूकडील वाहतूक ठप्प झाली होती, पुण्याहून सातारा बाजूकडे जाणारी वाहतूक केसुर्डी फाटा येथे थांबविण्यात आली तर साताऱ्याहून पुण्याला जाणारी वाहतूक जुना टोल नाका वाई तालुक्यातील वेळे येथे थांबविण्यात आली होती. मोर्चा शांततेत पार पाडावा व कोणताही अनुचित प्रकार घडू नये,यासाठी विभागीय पोलीस अधिकारी राहुल धस यांच्या नेतृत्वात सातारा जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त दाखल झाला होता.या प्रसंगी शिरवळ पोलीस निरीक्षक नवनाथ मदने,खंडाळा पोलीस निरीक्षक वंदना श्रीसुंदर,सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर आदींनी पोलिस बंदोबस्तात प्रमुख भूमिका बजावली. खंडाळा तहसीलदार अजित पाटील यांनी आंदोलनकर्त्यांकडून निवेदन स्वीकारले. धनगर आरक्षण लढ्याची सुरुवात लढ्याचे जनक दिवंगत बी.के. कोकरे यांनी तब्बल ३४ वर्षांपूर्वी खंबाटकी घाट अडवून क्रांतीची मशाल पेटवली होती.



**आंदोलक-पोलिसांमध्ये झटापट...**
तब्बल दीड ते दोन तासानंतर सातारा व पुणे या दोन्ही बाजूंनी गाड्या पुढे जाण्यासाठी वाहनधारक निघाले असता आंदोलक व पोलिसांमध्ये झटपट झाली. महामार्गावर आंदोलनकर्ते झोपू लागले, मात्र पोलिसांनी समन्वय साधत आंदोलनकर्त्यांची समजूत काढून, दोन्ही बाजूंनी वाहतुकीसाठी महामार्ग खुला केला.

**महामार्गावर वाहनांच्या लांबच रांगा...**
तब्बल दीड ते दोन तास पुणे- बंगळुरू महामार्ग आंदोलनकर्त्यांनी रोखून धरला. रुग्णवाहिका सोडून इतर कोणत्याही वाहनाला जाऊ दिले नाही.त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली.आंदोलन स्थळापासून सातारा व कात्रज पुणे दोन्ही बाजूला तब्बल ५० किलोमीटर पर्यंत वाहनाच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# ज्योत दिव्याची मंद तेवते....



आधुनिक केसरी

स्नेहाचं तेल आणि वाती असतात म्हणूनच ज्योत प्रकाशमान होते, हे ज्योतीनं कधी विसरू नये. आता त्या ज्योतीसमोर एकच लक्ष्य असतं. तिच्या भोवती जो अंधःकार असतो, त्याला नाहीसं करणं. तेच तिचं जीवनकार्य असतं. लहानपणी वाचलेली घरभर प्रकाश ही गोष्ट आठवते का ? एक वडील आपल्या मुलांना प्रत्येकी दहा रुपये देतात आणि त्या दहा रुपयात घर भरेल अशी वस्तू आणायला सांगतात. त्या मुलातील एक मुलगा मोठ्या हुशारीने आपले डोके चालवून चार पणत्या घेऊन येतो आणि संध्याकाळच्या वेळी त्या घरात लावतो. संपूर्ण घर प्रकाशाने उजळून जाते, अंधःकार नाहीसा होतो. तेच काम दिव्याचे असते. या प्रकाशमान ज्योतीवर आणखी एक जबाबदारी नकळत येते. ती म्हणजे दिव्याने दिवा पेटवणं. आपल्या आयुष्यात जेवढे दीप आपल्याला प्रज्वलित करता येतील, तेवढे करायचे असतात. तरच दिव्याचा जन्म सार्थकी लागतो. ज्ञानेश्वर माउली म्हणतात जैसी दिपकळिका धाकुटी । परी बहू तेजाते प्रगटी । तैसी सद्बुद्धी हे थेंकुटी । म्हणो नये ।। दिव्याची ज्योत जरी छोटी किंवा लहान असली तरी तिचे तेज पुष्कळ असते. त्या तेजात अंधार दूर करण्याचे सामर्थ्य असते. तसेच माणसाजवळ थोडी जरी सद्बुद्धी असेल, तर ती त्याचा जन्म सार्थकी लावण्यास पुरेशी असते. ती त्याची जन्ममृत्युपासून सुटका करते. या ज्योतीने एक काळजी मात्र घ्यायची असते. ती म्हणजे ' अहंकाराचा वारा ।न लागो राजसा । माझिया विष्णुदासा । भाविकांसी ।। संत नामदेव महाराज म्हणतात अहंकाराचा वारा लागू देऊ नका. त्यामुळे भल्याभल्यांचा नाश झाला आहे. नम्रता हा फार मोठा गुण आहे. ' महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळे वाचती असे आपण म्हणतो ते खरे आहे. महाभारतातील कर्णाचे उदाहरण इथे आठवते. कर्ण उदार होता,शूर होता पण आपल्या श्रेष्ठत्वाचा अहंकारही त्याला होता. माणसाला अहंकार असला की योग्यायोग्यतेचा विवेक त्याला राहत नाही. तो अधर्माने वागतो. युद्धात कर्णाच्या रथाचे चाक भूमीत रुतले. तेव्हा कर्ण अर्जुनाला म्हणतो, ' तू शूर आहेस, सदाचारी आहेस, धर्माने वागणारा आहेस. तेव्हा माझ्या रथाचे चाक निघेपर्यंत थांब. ' ते ऐकून श्रीकृष्ण कर्णाला म्हणाले, ' तुम्ही सगळ्यांनी मिळून अधर्माने एकट्या अभिमन्यूची हत्या केली. द्रौपदी वस्त्रहरण केले. अशा प्रसंगी तुला धर्म आठवला नाही आणि आता तू धर्माच्या गोष्टी करतोस. पण आता वेळ गेलेली आहे.



# आनंदी पहाट

## चिंता नव्हे; चिंतन करत राहावे

आधुनिक केसरी

चिंता विविध गोष्टींमुळे होऊ शकते जसे कि, तणाव, अनुवांशिकता, मेंदूचे रसायनशास्त्र, क्लेशकारक घटना किंवा पर्यावरणीय घटक ही होत. चिंताविरोधी औषधाने लक्षणे कमी करता येतात, परंतु औषधोपचार करूनही, काही जणांना अजूनही काही चिंता किंवा पॅनीक अटॅकचा अनुभव येऊ शकतो. चिंताग्रस्त विकारांमुळे जलद हृदय गती, धडधडणे आणि छातीत दुखणे अशा प्रकारच्या विपरीत परिणामांना सामोरे जावे लागते, काहीजणांना उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका देखील असू शकतो. अगोदरच हृदयविकार असल्यास, चिंताग्रस्त विकारांमुळे कोरोनरी इव्हेंट्सचा धोका वाढू शकतो. निदान न झालेल्या किंवा उपचार न केलेल्या चिंता विकार असलेल्या बहुसंख्य लोकांसाठी, व्यक्ती आणि समाज या दोघांसाठी अनेक नकारात्मक परिणाम निर्माण करणारे ठरू शकतात. यामध्ये अपंगत्व, काम करण्याची क्षमता कमी झाल्याने उत्पादकता कमी होणे आणि आत्महत्येचा उच्च धोका निर्माण होणे, यांचा समावेश असतो. नकारात्मक दृष्टीकोन आणि असहायता तसेच निराशेच्या भावना दीर्घकालीन तणाव निर्माण करू शकतात, ज्यामुळे शरीरातील संप्रेरक संतुलन बिघडते. आनंदासाठी आवश्यक असणारी मेंदूतील रसायने कमी होतात आणि रोगप्रतिकारक शक्ती बिघडत जाते, दीर्घकालीन तणावामुळे आपले आयुर्मान देखील कमी होऊ शकते. जेव्हा आपण विचार करतो की काहीतरी वाईट होईल तेव्हा हमखास काहीतरी वाईटच घडते. म्हणजेच आपण जसा विचार करतो तसेच घडते. ह्यासाठी नेहमी सकारात्मक विचार करावा म्हणजे अनुभव देखील सकारात्मकच येत राहतात. दैनंदिन ताणतणाव, झोपेच्या खराब सवयी आणि आरोग्याच्या इतर परिस्थितींमुळे रात्रीच्या वेळी चिंता आणि पॅनीक अटॅक वाढू शकतात. अर्थात, त्यावर अनेक उपचार उपलब्ध आहेत जे तुमची चिंता कमी करण्यात आणि तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकतात.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## विकारांची सत्ता | नष्ट होते ||

घ्यावा मानपान | सत्कार स्विकारा ||
परी अहंकारा | मानु नये ||१||
पर पीडा जाणी | तोचि जाण संत ||
दांभिकांची खंत | मानु नको ||२||
आपली वेदना | भोगावी आपण ||
दुजा असे जाण | मानी कैसा ||३||
आपुल्या चित्ताशी | साधावा संवाद ||
भेटता गोविंद | ओळखावा ||४||
होऊनीया लीन | टेकविता माथा ||
विकारांची सत्ता | नष्ट होते ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

धर्मं च मे तथार्थं मे देहि मां पाहि मातृके| धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम् || ९२ || हे मातृके, मला धर्म दे तसेच अर्थ दे आणि माझे रक्षण कर. धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

देव यक्ष किन्नर नहीं, नहीं मनुज अबतार ।
ऋषि मुनि योगी है नहीं, कौन पुरुष यह न्यार
।।२१।।(स्वर्वेद प्रथम मण्डल नवम अध्याय)
०१/०९/२१

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
तो सत्पुरुष कोणी देव नाही. यक्ष, किन्नर किंवा कोणी मनुष्य नाही. ऋषि-मुनी-योगी नाही. या सर्वांहून वेगळा हा कोण पुरुष आहे ? ऋषि, मुनी, देव, मनुष्य हे सर्व जीव कोटीत येतात. आपल्या कर्म, गुण, स्वभावानुसार जीवाचं नामकरण होत असतं. जीवांच्या भिन्न भिन्न कर्म, व्यवहार, आचरण आणि उत्थान झाल्याने कर्माच्या कोटी भेदानुसार अनेक नावे असतात. परंतू हे सर्व आत्मे जीव कोटीतील आहेत. सद्गुरू जीव नाहीत. ते सर्व जीवांचे रक्षक, ज्ञान प्रदाता, मोह-अंधःकार नष्ट करणारे अध्यात्म सूर्य आहेत. या सर्व जीव कोटीच्या संज्ञांपेक्षा वेगळा असा हा कोण पुरूष आहे, ज्यांचं वर्णन स्वर्वेदची ही वाणी करत आहे ?

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

# काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ४४वे

वयाची चाळीशी उलटून गेलेली
महाराजांची भ्रमंती कमी झाली
या दरम्यान भारतवर्षाची त्यांनी
तीन वेळा पूर्ण पदयात्रा केली ।।
या काळात ते शेकडोंना भेटले
जो जो भेटला त्याला महाराजांनी
रामनामाचे महत्व पटवले
हजारोंनी त्यांना आपला गुरू केले ।।
गावोगावी फिरणे त्यांचे कमी झाले
मुक्कामी गोंदवल्यास राहू लागले
लौकिक श्रीमहाराजांचा ऐकुनी
लोक लांब लांबून येऊ लागले ।।
गोंदवल्यास येजा वाढू लागली
साधू, भक्तजन, वारकरी येती
भेटुनी श्रीमहाराजांना मग हे
पुढे पंढरपूरच्या वाटेला लागती ।।
लोका थांबण्या मारोती मंदिराची
जागा आता अपुरी पडू लागली
परिवारसह आलेल्या भक्तांना
जागेची जरूरी भासू लागली ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# काळजी करायची तर नामाची करा

आधुनिक केसरी

आपण असे पाहतो की आज जे दुःखाचे वाटते तेच पुढे सुखाचे होते, आणि जे सुखाचे आहे असे वाटते तेच पुढे दुःखाला कारणीभूत होते. तुम्हांला जे सुखदुःख येते ते भगवंतापासून येते म्हटले, तर दुःखाचे कारण काय ? जोपर्यंत परक्याने दिलेले दुःख भगवंतानेंच दिले असे वाटत नाही, तोपर्यंत आपण भगवंताचे झालो नाही. आपण घाबरतो केव्हां, तर आपला आधार सुटला म्हणजे, जे जे होते ते रामाच्या इच्छेने होते असे समजावे. संकटे देवाने आणली तर ती सोसण्याची शक्तीही तोच देतो. समर्थांचे होऊन असे भ्यावे का ? समर्थांचे जे झाले त्यांनी परिस्थितीला नाही डगमगू. प्रत्यक्ष संकटाचे निवारण जर करता येते, तर मग भिती कशाची धरावी ? मुळात जी भिती नाही ती तुम्ही मनाने निर्माण करता याला काय म्हणावे ? खेळातली सोंगटी मेली म्हणजे त्याचे सुख-दुःख कोणी करतो का ? तसे व्यवहारात आपण वागावे. सुखाने हुरळून जाऊ नये आणि दुःखाने अस्वस्थ होऊ नये. असे व्हायला आपले मन शांत राहणे जरूर असते. जोपर्यंत 'मी कर्ता आहे' अशी भावना असते, तोपर्यंत सुखदुःखाचे हेलकावे मनाला बसतात. म्हणून कर्तेपण रामाकडे द्यावे, आणि देहाने कर्तव्यात राहून मन शांत ठेवावे. 'परिस्थितीचा परिणाम माझ्या मनावर घडू देऊ नको देवा' असे म्हणावे, 'परिस्थितीच बदल' असे देवाला म्हणू नये. ज्याप्रमाणे एखादे विष रक्तात मिसळावे, त्याप्रमाणे काळजी आपल्या अंगात भिनली आहे. त्याला वरून औषध लावले तर उपयोग होत नाही. ह्यासाठी भगवंताच्या अनुसंधानाचे इंजेक्शनच पाहिजे. जे दुर्गुण भगवंताचा विसर पाडायला कारण होतात, त्या सर्वांचा संग्रह म्हणजे काळजी होय. काळजी हा फार मोठा रोग आहे. पोटात रोग वाढला आणि त्यानेच पोट भरले की रोग्याला अन्न जात नाही. त्याचप्रमाणे, ज्याला काळजी फार, त्याच्या हृदयात आनंद जाऊच शकत नाही. या काळजीचे आईबाप तरी कोण ? देहबुद्धीमुळे आपल्याला काळजी लागते. देहबुद्धी म्हणजे वासना. वासना आणि अहंकार हे काळजीचे आईबाप आहेत. अशा और स्वभावाचे आईबाप असल्यावर पोर असे विचित्र असायचेच ! भगवंताचे स्मरण करीत गेल्याने आईचा आणि मुलीचा मृत्यू बरोबर घडून येतो; वासना आणि काळजी दोघीजणी एकदम मरतात. खरे म्हणजे, एकच स्थिती कधी कायम राहात नाही म्हणून आपल्याला भिती वाटते, आणि तिच्यातून काळजी उत्पन्न होते. काळजी जितकी आपल्याला मारते, तितकेच नाम आपल्याला तारते. तरीसुद्धा आपण काळजीलाच पकडून बसतो, याला काय म्हणावे ? आपला जेवढा वेळ काळजीत गेला तेवढा वाया गेला असे समजावे. काळजी करायचीच असेल तर अनुसंधान कसे टिकेल याची करा.



# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

मध्येच दुसरा मार्ग घेतला, तर पल्ला कधीच गाठायचा नाही. एका वैद्याचे औषध सोडून दुसऱ्याचे घेतले, तर पहिल्या वैद्याची जबाबदारी संपली. तरीही गुरु आपल्या माणसाला सोडीत नाही ही गोष्ट निराळी. ज्या दिवशी त्यांनी तुम्हाला अनुग्रह देऊन आपला म्हटले, त्या दिवशीच सर्व प्रापंचिक आणि पारमार्थिक जबाबदारी गुरूवर सोपवून तुम्ही मोकळे झाला, गुरुआज्ञेशिवाय तुम्हाला दुसरे कर्तव्यच उरले नाही. पण आपल्याला असे वाटते कुठे ?

पुष्कळांना संतांची गाठ पडते, परंतु सत्संगतीचे महत्त्व न कळल्यामुळे बहुतेकांना त्यापासून जो व्हायला पाहिजे तो फायदा होत नाही. आपली जी कर्तव्ये ठरली आहेत ती आपण बरोबर करावीत. व्यापार थोडक्या प्रमाणात केला तर पुढे वाढतो, त्याप्रमाणे कर्तव्य करीत गेल्याने फळाची आशा आपोआपच सुटेल. आई मुलाची फार तर एक जन्मापर्यंत, म्हणजे देह आहे तोपर्यंतच काळजी करील; पण गुरू हा जन्मोजन्मी तुमची काळजी घ्यायला तयार आहे.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

स्थिरावली गंगा ।पांगविली म्हणे उगा ॥२॥
मोहरी पांवा काठी ।तुका म्हणे यांजसाठी ॥३॥
वळी गाई धांवे घरा ।आमच्या करी येरझारा ॥१॥
नांव घेतां तो जवळी ।बहु भला कान्हो बळी ॥ध्रु.॥
नेदी पडों उणें पुरें ।म्हणे अवघें चि बरें ॥२॥
तुका म्हणे चित्ता ।वाटे न व्हावा परता ॥३॥

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, २२ सप्टेंबर २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari


## ग्राहकांची विश्वासहर्ता हीच महावीर घर संसारची ओळख

### सुमित पारख :महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कार्यालयात गणेश आरती

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** --- वर्षापूर्वी स्थापन केलेल्या महावीर घर संसार ग्राहकांच्या विश्वासहर्तेच्या जोरावर शहरात सात शाखांचा शुभारंभ केला असून ग्राहकांची विश्वासहर्ता हीच महावीर घर संसारची ओळख असल्याचे प्रतिपादन सुमित पारख, महावीर घर संसारचे संचालक यांनी केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाच्या महाआरती प्रसंगी सुमित पारख बोलत होते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या संकल्पनेतून दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती संभाजीनगरातील विभागीय कार्यालयात श्री गणेशाची स्थापना करण्यात आली.

यावेळी पुढे बोलताना सुमित पारख म्हणाले की, आशिया खंडात सर्वाधिक वेगाने वाढणारे शहर म्हणून छत्रपती संभाजीनगरची ओळख आहे. या ऐतिहासिक शहरात उद्योग आणि व्यापाराला प्रचंड वाव असून गुणवत्ता टिकवून ठेवली तर ग्राहक परत परत आपल्याकडे आकर्षित होतात, कुठलाही व्यापार करताना डोक्यावर बर्फाचा गोळा आणि तोंडात साखर ठेवून कार्य केले तर यश हमखास मिळते असा आमचा आतापर्यंतचा अनुभव आहे. श्री गणेशाच्या कृपेने छत्रपती संभाजीनगरातील लाखो ग्राहकांचे प्रेम आमच्यावर असेच कायम राहील, असा विश्वासही शेवटी सुमित पारख यांनी केला. यावेळी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे, जिल्हा संघटक विलास शिंगी, जिल्हा उपाध्यक्ष छबुराव ताके, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, कार्यालय प्रमुख संजय व्यापारी, सहसचिव संदीप घंटे, अतुल खंडगावकर, छायाचित्रकार सचिन उबाळे आदींसह पत्रकारांची उपस्थिती होती.

## ई -पीक पाहणीला करा घाई

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शेतकऱ्यांनी पेरलेल्या पिकाची अचूक नोंद शासन दप्तरी व्हावी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा व्हावा या दृष्टीने सुरू करण्यात आलेल्या 'ई-पीक पाहणी' ॲपवर पिकांची नोंदणी करण्याची २५ सप्टेंबर ही शेवटची तारीख आहे. या नोंदणीसाठी फक्त ४ दिवसांचा कालावधी राहिल्याने शेतकऱ्यांना याबाबत तातडीने नोंदणी करावी, असे आवाहन माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले. राज्य शासनाच्या वतीने महसूल व कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ई-पीक पाहणी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेत शेतकऱ्यांनी स्वतःच प्रत्यक्ष शेतात जाऊन मोबाईलच्या साह्याने ई-पीक पाहणी करून त्याची संबंधित अँपवर नोंद करायची आहे. या ई-पीक पाहणीमुळे शेतकऱ्यांच्या पीक पेरणीची अचूक नोंद होणार आहे. नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाल्यास शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी यासंदर्भातील आकडेवारी कामाला येणार आहे तसेच शासनालाही एकूण किती जमिनीवर कोणत्या पिकाचा पेरा झाला, याची माहिती उपलब्ध होणार आहे.

## 1 कोटी 11 लाखांचा सुगंधित तंबाखू जप्त

### अन्न व औषध प्रशासन विभागाची संयुक्त कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 10 सप्टेंबर , 2023 ला आधुनिक केसरीने अन्न व औषध प्रशासन, स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई झाली पुढे काय ? अशी बातमी प्रकाशीत केली होती. बल्लारशा हे सुगंधित तंबाखू विक्रीच हब होत चाललंय , लहान मोठ्या प्याद्यांवर कारवाई केली जाते. मोठ्या व्यापाऱ्यांपर्यंत पोलीस प्रशासन का पोहोचू शकत नाही ? असा सवाल या बातमीत करण्यात आला होता. आज चंद्रपूर पोलीस विभाग, स्थानिक गुन्हे विभाग, अन्न व औषध प्रशासन विभाग या सगळ्यांनाच गुंगारा देत तब्बल 1 कोटी 11 लाखांपेक्षाही अधीक किंमतीचा माल घेऊन जाणारे दोन ट्रक चंद्रपूर वरून निघूनही गेले होते परंतू नागपूर व अमरावती अन्न व औषध प्रशासन विभागाच्या संयुक्त पथकाने बल्लारशा टोल नाक्यावर या ट्रक ला पकडण्यात यश मिळविले.

जी माहीती नागपूर, अमरावतीच्या विभागाला मिळू शकते ती माहीती चंद्रपूर च्या संबंधित विभागाला का मिळू शकत नाही ? की माहीती मिळूनही हात ओले होत असल्याने दुर्लक्ष केल्या जात आहे ? असा प्रश्न आता चंद्रपूरातील चौकाचौकात विचारल्या जात आहे.

सार्वजनिक आरोग्याच्या हितासाठी गुटखा, पान मसाला , सुगंधित तंबाखू , इ. अन्न पदार्थांचे उत्पादन, साठा, वितरण, वाहतूक किंवा विक्री यावर संपूर्ण राज्यात बंदी असतांना बल्लारशा मधे मात्र प्रचंड मोठ्या प्रमाणात सुगंधित तंबाखूची विक्री होत आहे. यापूर्वीच अन्न व औषध प्रशासन विभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेने आठ दिवसात दोन धाडी टाकून लाखोचा माल जप्त केला होता. यात बल्लारशा मधील अशोक बांबोळे याला अटकही झाली होती. किराणा दुकानातून तो सुगंधित तंबाखू विक्री करत होता. तर दुसऱ्या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात माल पाडला होता . यात फक्त लहान आणि किरकोळ व्यापाऱ्यांवर कारवाई करण्यात येत आहे असे दिसून आले.

परंतू आज मात्र तब्बल एक कोटी 11 लाखापेक्षाही अधीक सुगंधित तंबाखूचे दोन ट्रक पकडण्यात आले असुन यातील ड्रायव्हर ला संबंधित अधिकाऱ्यांनी विचारपूस केली असता त्यांना उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. अखेर बल्लारशा पोलीस स्टेशन ला प्रकरण पोहोचताच स्थानिक पातळीवर सुगंधित तंबाखू चा मोठा व्यापारी म्हणून ओळख असलेल्या कन्नूच्या माणसांनी याच ट्रक ड्रायव्हरला नाश्ता व चहा ची लगेच स्पेशल व्यवस्था करून दिली. बल्लारशा पोलीस स्टेशनला प्रकरण पोहोचल्यानंतर जर ट्रक ड्रायव्हरला स्पेशल नाश्त्याची व्यवस्था होत असेल तर यात स्थानिक पोलीस निरीक्षक उमेश पाटील यांची भुमिका काय यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. स्थानिक पोलिसांना येथील मोठे व्यापारी कोण ? याची माहीतीच नाही ? की सगळ्यांचीच तेरी भी चुप मेरी भी चूप अस म्हणत धंदा चालू देण्याची भुमिका आहे ??

आज झालेल्या कारवाईत आता जयसुख हे नविन नाव समोर येत असून यापूर्वी सुद्धा वैभव , निरज यांचीही नावे समोर आली होती . चौकाचौकात या नावांची चर्चा होत असताना हे कन्नू , जयसुख , वैभव , निरज हे आहेत तरी कोण आणि पोलीस विभाग यांच्यापर्यंत का पोहोचू शकत नाही ? पुछता है चंद्रपूर म्हणून आता स्थानिक बल्लारशा पोलीस स्टेशन काय कारवाई करते याकडे आता सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

चंद्रपूर बल्लारशा मार्गावर असलेल्या विसापूर टोल नाक्याजवळ वाहन क्र. MH 25 , U 1211 ( ASHOK LEYLAND ) व TS 07 , UE 7206 ( ASHOK LEYLAND ) यामधे पांढऱ्या मोठ्या पोत्यांमधे 11034 किलो पान मसाला ( सागर ) असा 1 कोटी 11 लाख 35 हजार 250 रुपये किंमतीचा साठा पकडण्यात आला असुन वाहन चालक रविचंद्र कमन्ना, अरविंद मिश्रा दोघेही राहणार बिदर , कर्नाटक सूर्यप्रकाश पांडे, ईस्माईल शेख रा. हैद्राबाद, मुजम्मील रहमान उर्फ जमील, वाहन मालक सैय्यद मुनवरन रहेमान, रा. रंगारेड्डी, तेलंगणा, व गौसुद्दिन शेख दाऊद, रा. रंगारेड्डी, तेलंगणा यांचे विरुद्ध पो.स्टे. बल्लारशा येथे अन्न व सुरक्षा मानदे कायदा 2006 मधील कलम 26 (1) , 26 (2)(I) , 26(2)(IV), सहवास कलम 30(2)(A) , तसेच भा.द. सं. कलम 188, 273 आणि 328 नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. अन्न औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या सुचने नुसार अभिमन्यू काळे, अन्न सुरक्षा आयुक्त व समाधान पवार, सह आयुक्त (दक्षता) यांचे आदेशानुसार आनंद महाजन, सहायक आयुक्त (गुप्त वार्ता व रोहण शहा, सहायक आयुक्त चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली तसेच उमेश पाटील, पोलिस निरीक्षक बल्लारपूर यांच्या सहकार्याने गुप्त वार्ता विभागातील अन्न सुरक्षा अधिकारी यदूराज दहातोंडे, राजेश यादव, संदिप सूर्यवंशी तसेच चंद्रपूर कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी प्रफुल टोपले, प्रवीण उमप, गिरीश सातकर यांनी पार पाडली.

या कारवाई ने चंद्रपूर जिल्ह्यात प्रचंड खळबळ माजली असून अनेकांचे धाबे दणाणले आहेत.



## वैजापुरातील धार्मिक व ऐतिहासिक देखाव्यांनी वेधले नागरिकांचे लक्ष

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** शहरातील डेपो रोड, नाशिक रोड,जुने बस स्थानक छत्रपती शिवाजी महाराजपुतळापरिसर, जि.प.प्रशाला मैदान, संकट मोचन मंदिर परिसर, स्टेशन रोड या भागातील गणेश मंडळांनी धार्मिक, सामाजिक,व ऐतिहासिक देखावे सादर करुन शहरातील नागरिकांचे लक्ष्य वेधले आहे. जि.प. प्रशालेच्या मैदानावर प्रति पंढरपूरचा देखावा, सादर करण्याचा प्रयत्न सिद्धनाथ गणेश मंडळान केलेला आहे. मोरया ग्रुपने महाराष्ट्र बँक जवळ नैसर्गिक जंगल उभारून वडाच्या पारंब्यात श्री गणेश मूर्ती बसवली आहे. स्वामी समर्थ मंदिरात

चांद्रयान-३ प्रतिकृती उभारून श्री गणेशाची स्थापना केली आहे. छत्रपती शासन गणेश मंडळाने १७ फूट उंच गणेशाची मूर्ती ठक्कर बाजार जुने बस स्टॅण्ड येथे बसवली आहे. तर छत्रपती शिवाजी महाराज परिसरात महाराजांच्या पुतळ्या शेजारी वैजापूरचा राजा म्हणून

गणपती मूर्ती सर्वांचे लक्ष वेधत आहे,शनिमंदिर शेजारी भव्य अशी महादेव पिंड असून पन्नास फूट वर भगवान महादेव विराजमान असून त्यांच्या व त्यांच्या गळ्यातील साप यांची यांत्रिक हालचाल वैजापूर वाशीयांचे लक्ष्य वेधत आहे,शहरात बऱ्याच गणेश मंडळांनी विविध देखावे सादर करण्यास आरंभ केलेला आहे. श्री गणेश महासंघ शाखा वैजापूर चे पदाधिकारी काशिनाथ गायकवाड, प्रकाश शेठ बोथरा, जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, धोंडीरामसिंह राजपूत, बापूसाहेब गावडे, बबन क्षीरसागर यांनी बऱ्याच गणेश मंडळच्या देखाव्याना भेटी देऊन व पदाधिकारी वर्गाला भेटून श्री गणेशोत्सव शांततेत व बंधुभावाने,साजरा करण्याचे आवाहन केले आहे.




## ‘कूली नंबर वन’

आधुनिक केसरी

काँग्रेसचे खासदार आणि माजी अध्यक्ष राहुल गांधी सातत्याने सामान्य लोकांमध्ये जाऊन त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत जोडो यात्रेदरम्यान ते देशभरातल्या असंख्य लोकांना भेटले. अलिकडेच त्यांनी अवजड वाहनचालकांबरोबर, भाजी विक्रेत्यांबरोबर एक दिवस घालवला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. दरम्यान, राहुल गांधी यांनी गुरुवारी (२१ सप्टेंबर) दिल्लीतल्या आनंद विहार रेल्वेस्थानकावर जाऊन तिथल्या हमालांशी बातचीत केली. यावेळी राहुल गांधी यांनी हमालांचा लाल रंगाचा शर्ट परिधान करून एका प्रवाशाची बॅग डोक्यावर घेतली. राहुल गांधी यांनी हमालांचा लाल शर्ट परिधान केला, हमालांचा अधिकृत नंबर असलेला बिल्ला (बॅच) दंडावर बांधला. तसेच एका प्रवाशाची बॅग डोक्यावर घेऊन काही अंतर चालले. तसेच या हमालांबरोबर त्यांनी बराच वेळ गप्पा मारल्या. देशातल्या सध्याच्या स्थितीवर या हमालांचे मत जाणून घेतले. राहुल गांधी यांनी हमालांबरोबर घालवलेले काही क्षण त्यांनी इन्स्टाग्रमावर शेअर केले आहेत. तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसनेही राहुल गांधी यांचे काही फोटो ट्विटरवर शेअर केले आहेत. राहुल गांधी यांनी हमालांबरोबरचे फोटो शेअर करताना कॅप्शनमध्ये लिहिलं आहे की “मलाही या सगळ्यांना भेटण्याची खूप दिवसांपासून इच्छा होती आणि त्यांनी मला खूप आपुलकीने बोलावले होते. भारतातल्या कष्टकरी बांधवांची इच्छा कोणत्याही किंमतीत पूर्ण व्हायलाच हवी. दरम्यान, यूथ काँग्रेसनेही राहुल गांधी यांचे फोटो शेअर केले आहेत. कॅप्शनमध्ये लिहिले आहे की अख्ख्या जगाचे ओझे आपल्या डोक्यावरून वाहणाऱ्यांच्या मनावरचं ओझे हलके करण्यासाठी राहुल गांधी आज आनंद विहार स्टेशनवर गेले होते. यावेळी राहुल गांधी यांनी हमालांची ओळख असलेला लाल रंगाचा शर्ट परिधान केला होता. तसेच एका प्रवाशाची बॅगही त्यांनी डोक्यावर घेतली. राहुल गांधी बराच वेळ हमालांबरोबर रेल्वेस्टेशनबाहेर रस्त्याच्या कडेला बसले होते. तसेच तिथे असलेले हमाल आणि इतर प्रवाशांनीही राहुल गांधी यांना पाहण्यासाठी गर्दी केली होती. दरम्यान, एका हमालाने त्याचा बिल्ला (हमालाचा अधिकृत बॅच) राहुल गांधी यांच्या दंडावर बांधला. राहुल गांधी हे त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून सामान्य लोकांना भेटत आहेत. त्यांच्याबरोबर वेळ घालवत आहेत. ते कधी भाजी विकेत्यांबरोबर दिसतात, कधी शेतकरी तर कधी छोट्या व्यापाऱ्यांची भेट घेतात.



प्रा. देविदास इंगळे
संपर्क क्र. 7507463278

## असे संविधान पुन्हा होणे नाही

आधुनिक केसरी

**संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन केल्यानंतर सर्व घटनेचा म्हणजेच संविधानाचा सार यामध्ये आहे. भारत एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा आणि सर्व नागरिकास सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय विचार अभिव्यक्ती विश्वास श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जा ची व संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वामध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधूता हा घटनेचा पूर्ण सार आहे संयुक्त राष्ट्र संघ सरचिटणीस एटेनियो गुटेरस म्हणतात भारतीय संविधान जगात सर्वोतम आहे मी जगभरातील संविधान वाचले आहेत. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाशी कोणीही स्पर्धा करू शकत नाही.**

जगातील सर्व देशांनी भारतीय राज्यघटनेचा स्वीकार केल्यास अवघ्या 5 वर्षात संपूर्ण जगातून गरिबी, निरक्षरता, बेरोजगारी आणि दहशतवाद कायमचा संपुष्टात येईल. असे असतांना सुद्धा काही बिनडोक लोक संविधान बदलण्याची भाषा करतात, जंतर मंतर वरती संविधान जाळण्यात आले त्यांच्यावर देशद्रोहाचा खटला भरण्यात आला आणि यापुढे सुद्धा संविधानावर बोलणाऱ्यावर सुद्धा देशद्रोहाचा खटला भरला पाहिजे ज्या संविधानातून सर्वांना न्याय, त्यांचे अधिकार, हक्क, समान संधी, धार्मिक स्वातंत्र्य अशा सर्व गोष्टी मिळत आहेत हेच मनुवादी, आर एस एस च्या लोकांना बघवत नाही केवळ आरक्षण आणि अट्रॉसिटी या मुदयावर लोकांना पेटवून देत रहातात पण लक्षात ठेवा समूळ जातच नष्ट केली ती ही कागदावरून काय होईल आरक्षण बंद, अट्रॉसिटीची गरज भासणार नाही हे कोणी करत नाही त्याच कारण भारतातील राजकारण हे जाती धर्मावर चालणारे आहे हे मिटवायचंच नाही म्हणून हे वाढतंय. ऐकीकडे लोकांना सांगायचं यांचं आरक्षण रद्द करू आणि त्यांना आरक्षनाचे गाजर दाखवायचे हे कुठल्या गणितात बसते लोकांनी समजून वागलं पाहिजे. इंग्रज ज्या पद्धतीने तोडा फोडा आणि राज्य करा ही नीती आता स्वकीय वापरत आहेत आणि राज्य करीत आहेत. देशाच्या पंतप्रधानकडून अपेक्षा होती की समान न्याय मिळेल पण नाही भ्रमनिरास सुरवात झाली ती 15 लाखापासून आणि शेवट झाला तो 5 किलो राशन पर्यंत हीच ती मझल सर्वांच्या भूवया उंचावल्या होत्या बाहेर देशातून विकसित तंत्रज्ञान आणून रोजगाराचा प्रश्न मिटेल पण घडले निराळे यांनी तर देशातील संपती विकून रोजगार होता त्यांना देशोधडीला लावले आणि देशातील सर्व संपती विकून ए कट्याच्या घश्यात घातली आज राजकीय लोक समाजसेवेच्या नावावर कोठ्यावधीचे घबाडं गोळा केलीत याचा फायदा घेऊन महाराष्ट्रातील सरकार त्यांना जेल मध्ये टाकण्याऐवजी सत्तापिपासू ईडी च्या नावाने ब्लॅकमेल करून क्लीन चिट देत त्यांना त्यांच्यात सामावून घेत आहेत लाज वाटणारी बाब पण लाज इजत वेशिवर टांगून हे सर्व कार्य चालू आहे.केवळ महाराष्ट्रातच नसून देशात खाजगीकरणाचे पेव फुटले आहे तीन वेळा केंद्रात IAS दर्जाचे पदं ना परीक्षा ना मुलाखत ज्या पदासाठी 5-5 वर्षे अभ्यास करून भरली जाणारी पदे सरळ भरताहेत आणि महाराष्ट्रातील शाळांचे खाजगीकरण करून 1,2,3 कोटी जो देईल त्यांचे नाव शाळेला देणार आणि तेच कंत्राटदार शाळा चालवणार आणि नौकर भरती ही कंत्राटदारकडून करणार त्यांचे नातेवाईक, वशिला, पैसा याचा सर्रास वापर होणार हुशार मागे पैसेवाला पुढे असेच होणार हे सर्व खर्चात कपात करण्यासाठी आहे म्हणे आणि शासन आपल्या दारी ऐका ऐका जिल्ह्यात 5-5 कोटी खर्च कॅबिनेट वर कोठ्यावधी खर्च कॅबिनेट काय करते तर कंत्राटदारास कंत्राट देते या साठी मंत्रिमंडळ आहे का?यांनाच सरकारचे सतेवर राहणे कश्या साठी वाढती महागाई, वाढती बेरोजगारी, वाढत्या आरोग्याच्या समस्या,सामान्य माणूस शिक्षणापासून वंचित खाजगीकरणामुळे शिक्षण घेऊ शकत नाही आम्ही गप्प सहन करीत आहोत याचे कारण सरकारने राममंदिर दिलंय,370 रद्द केलंय 370 काय आहे तर जमू काश्मीर ला शेती जागा घेऊ शकू म्हणून घ्या जाऊन असे धर्माच्यानावावर लोकांना दिशाभूल करून देशातील लोकशाही नष्ट करून संविधान संपविण्यांचा कट आहे संविधान हे केवळ आरक्षणासाठी नसून ते सर्वांच्या संरक्षणासाठी आहे साधी गोष्ट भांडण झाले तर पोलीस स्टेशन कश्यावरून संरक्षण देते तर संविधानाने हे सामान्य जनतेला कळले पाहिजे संविधान वाचणं होत नसेल तर केवळ उध्येशपत्रिकेतून म्हणजेच प्रास्ताविकेतून समजून येते की संविधान काय काय देतं ही गोष्ट प्रत्येकापर्यंत पोहचविणे समजविणे काळाची गरज आहे जी गोष्ट सत्य आहे त्याला सत्य म्हणा साथ दया आज विज्ञानवादी बना आज पाश्चिमात्य देश शिक्षणाकडे वळले आणि आपला देश दैववादाकडे वळलो म्हणून शिक्षणाकडे कमी लक्ष झाले

ज्यांच्याकडे अमाप संपती आहे आणि दुसरीकडे लोक उपाशी आहेत अशी दरी आहे यासाठी इंदिरा गांधींनी शिलिंग एक्ट या कायद्याने प्रत्यक्ती 5-5 एकर जमिनी गरिबांना देवून सन्मान केला असे कोणी करीत नाहीत आताचे सरकार तर अमेरिकेचे दोन्ही अध्यक्ष आले तेव्हा गरिबांच्या घरांना आडवे पडद्या आड झाकून कार्यक्रम करतायत हा इतिहास आहे यावून अधिक शर्माईची बाजू कोणती आहे. आज सेवकपासून ते कलेक्टर पर्यतच्या नौकऱ्या एक रुपयाही न घेता विद्वतेवर मिळत होत्या सामान्य माणूस सुधारला हे संविधाना मुळे शक्य




होय आपणास माहित आहे की केवळ संस्था चालवण्यास दिल्यास 4000000 -4000000 लाख व 5000000-5000000 लाख काय झाडचा पाला आहे का?का यांनी घाम गाळून संस्था आणल्यात विचार करा धर्मवेडे होऊ नका माणूस म्हणून जगायला शिका कर्मचारी नौकरी लागली की झाले शेतकरी असो का कष्टकरी या कामगार का असेना काम करा म्हटलं की किती देतोस अरे हा बाजार कोण बंद करायचा?कोण येणार यासाठी हे आपणास करणे आहे यावर शिक्षा संविधानात आहे आपण आवाज उठवला पाहिजे हे फोफावत चाललंय मंत्री भ्रष्टाचार तर वेगळी बाजू पण आता नवीन बाजू म्हणजे पक्ष बदलण्यासाठी खोके नाही एकलं तर ईडीचा लगाम आणि देशाचे पंतप्रधान राष्ट्रवादी वर आरोप करतात इतक्या कोटींचा घोटाळा त्यांनी केला आणि लगेच दुसऱ्या दिवशी राष्ट्रवादीचे नेते मंत्री मंत्रीमडळात चेष्टा लावली की काय?राज्य चालवणारे जनतेला वेड्यात काढताहेत या सगळ्या गोष्टीवर आवर घालण्यासाठी संविधान हा एकमेव पर्याय आहे आणि हे सर्व अधिकार आपण संविधानाने प्राप्त करू शकतो म्हणून जागे व्हा, सावध रहा, लिहा, बोला, लढा देण्याचे सामर्थ्य ठेवा संविधान वाचवा, लोकशाही वाचवा व गुलामी टाळा म्हणून म्हणतो की असे संविधान पुन्हा होणे नाही.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

## द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी : राजू श्रीवास्तव

आधुनिक केसरी

**प्रसिद्ध स्टॅण्ड अप कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांचा आज २१ सप्टेंबर पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी आजच्याच दिवशी त्यांची प्राणज्योत मालवली होती त्यांच्या अकाली निधनाने मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली होती. द किंग ऑफ स्टॅण्ड अप कॉमेडी अशी ओळख असलेल्या राजू श्रीवास्तव यांचा २५ डिसेंबर १९५३ रोजी उत्तरप्रदेश मधील कानपुर येथे जन्म झाला. राजू श्रीवास्तव यांचे वडील कवी होते. बलई काका नावाने त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या होत्या राजू श्रीवास्तव लहान असताना आपल्या वडिलांच्या कविता म्हणत.**

शालेय वयातच त्यांना नकला करण्याचा छंद लागला. शाळेतील शिक्षकांच्या व गावातील माणसांच्या ते हुबेहूब नकला करत. पुढे ते अमिताभ बच्चन यांची नक्कल करू लागले. अमिताभ बच्चन यांचा हुबेहूब आवाज काढून त्यांनी केलेली नक्कल लोकांना इतकी आवडली की लोक त्यांना ज्युनिअर अमिताभ म्हणू लागले. अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणेच त्यांनी चित्रपट सृष्टीतील इतर कलाकारांची देखील नक्कल करण्यास सुरुवात केली. त्यांचा हा नकलाचा कार्यक्रम प्रेक्षकांना आवडू लागला. कानपूरमधील प्रेक्षक त्यांना कॉमेडीसाठी बोलवू लागले. त्यांचे कार्यक्रम लोकप्रिय होऊ लागले तेंव्हा त्यांच्या एका मित्राने त्यांना त्यांच्या कॉमेडीची सीडी बनवून विकण्याचा सल्ला दिला. मित्राने दिलेला हा सल्ला त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. राजू श्रीवास्तव यांनी त्यांच्या कॉमेडीची सीडी मार्केटमध्ये आणल्यानंतर त्यांच्या सिडीला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळाला. मुंबईतही त्यांच्या सीडी विकल्या जाऊ लागल्या. मुंबईतही त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली त्यामुळे ते मुंबईत आले आणि चित्रपटांसाठी ऑडिशन देऊ लागले. तेजाब आणि मैने प्यार किया या चित्रपटात त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. त्यांनतर बाजीगर, मिस्टर आझाद या चित्रपटातही त्यांनी भुमीका केल्या मात्र या भूमिकांनी त्यांना समाधान दिले नाही त्यामुळे ते टीव्हीकडे वळले. देख भाई देख या विनोदी मालिकेत त्यांना काम करण्याची संधी मिळाली. त्यानंतर त्यांनी शक्तिमान या मालिकेत काम केले. चित्रपट आणि टीव्हीवर काम करताना त्यांनी त्यांची स्टॅण्ड अप कॉमेडी काही सोडली नव्हती ते स्टॅण्ड अप कॉमेडी करतच होते. २००५ साली टीव्हीवर द ग्रेट इंडियन लाफटर चॅलेंज नावाचा कॉमेडी शो आला होता. या शो मध्ये



त्यांनी भाग घेतला. या शो ने त्यांना स्टार बनवले. या शो मध्ये त्यांनी सादर केलेले गजोधर काका, पिंकी पार्लरवाली ही पात्रे खूप लोकप्रिय झाली. या शो नंतर त्यांचे देशभर नाव झाले. त्यांना अनेक कार्यक्रमांमध्ये बोलावले जायचे. या काळात त्यांची कॉमेडी किंग अशीच इमेज झाली होती. २००९ साली बिग बॉस शो मध्येही भाग घेतला होता. २००५ ते २०१० हा त्यांचा सुवर्णकाळ होता. या काळात त्यांची लोकप्रियता गगनाला भिडली होती त्याचा लाभ घेऊन राजकारणात उतरण्याचा त्यांनी निर्णय घेतला मात्र त्यांना राजकारण मानवले नाही त्यामुळे ते पुन्हा कॉमेडीकडे वळले. त्यांनी आपली स्टॅण्ड अप कॉमेडी पुन्हा सुरू केली. आपल्या स्टॅण्ड अप कॉमेडीने त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली. राजू श्रीवास्तव यांच्याप्रमाणे अनेकांनी स्टॅण्ड अप कॉमेडी करण्याचा प्रयत्न केला पण राजू श्रीवास्तव यांच्या सारखी नक्कल आणि स्टँड अप कॉमेडी कोणालाही जमू शकली नाही. चित्रपट, टीव्ही आणि स्टेज शो मधून प्रेक्षकांना खळखळून हसवणारे राजू श्रीवास्तव यांचे असे अकाली जाणे प्रेक्षकांना चटका लावून जाणारे ठरले. स्टॅण्ड अप कॉमेडीचे किंग राजू श्रीवास्तव यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अरे वा ! गणित झाले सोपे; शिवाजी विद्यालयात गणितीय कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** बदनापूर तालुक्यातील दाभाडी येथे श्री शिवाजी विद्यालयामध्ये एक दिवशी गणितीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेतून गणिततज्ञ तथा नळणी येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील शिक्षक हरी निकम यांनी विद्यार्थ्यांना हसत खेळत शिकून गणित हा विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगितला.त्यांनी विद्यार्थ्यांची गणित या विषयांची भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यास विद्यार्थ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे दिसून आले. दाभाडी येथील शिवाजी विद्यालयात एक दिवसीय गणितीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाचे आध्यक्ष अशोकराव निकम, प्रमुख पाहुणे गोपिनाथ खरात तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून गणिततज्ञ हरी निकम यांची उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शक एच.व्ही.निकम यांनी गणितीय कार्यशाळेत आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना अगदी सोप्या पद्धतीने गणितीय सिद्धांत समजावून सांगितले. यावेळी निकम यांनी खडु फळ्याविना गणित कसे शिकवले जाऊ शकते याविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थांनीही वेगवेगळ्या कृती करून गणितीय कार्यशाळेचा आनंद लुटला. कृतीयुक्त पद्धतीमुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर होण्यास मदत होते, असे निकम यांनी सांगितले.




**गणित विषयाची भीती दूर होण्यास मदत होते** :गणितीय कार्यशाळेतून उद्देशपूर्ण आणि कृतीयुक्त शिक्षणावर भर दिला जातो .हा एक सामाजिक उपक्रम आहे .शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर सादरीकरण केले जाते .खडू फळा मुक्त गणित ही संकल्पना राबवली जाते .गणितीय संबोध, सकल्पना,प्रमेय सिद्धांत हे पडताळा करून दाखवतो . त्यामुळे गणितांविषयीची भिती दूर होण्यास मदत होते . **हरी निकम – गणिततज्ञ**

**गणित कसे सोडवायचे हे तंत्र अवगत झाले** :
गणितीय कार्यशाळेतून कमीत कमी वेळेत गणित कसे सोडवायचे हे तंत्र अवगत झाले .गणितामधील नवंनवीन पद्धतीची ओळख झाली .निकम सरांनी सोप्या पध्दतीने गणित समजावून सांगितले . त्यामुळे गणिताविषयीची भीती दूर झाली .
**भक्ती धनेधर,विद्यार्थिनी**

## ज्ञानकुंज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील ज्ञानकुंज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे वेटलिफ्टींग विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. विद्यालयातील सतरा वयोगटातील ४५किलो वजन गटात सुजीता धनेधर प्रथम तर ५३किलो वजन गटात प्रतिक्षा काटकर अव्वल स्थानी व ५७किलो वजन गटात प्रिती साबळे विजेती ठरली.क्रिडा स्पर्धेत तीन विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरी क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला त्यांची विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. यशाबद्दल विजय द्वारकुंडे भाऊसाहेब काळे प्राचार्य झिंजार्के तथा प्राध्यापक शिक्षक वृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## सोंगणीवर आलेल्या मक्याचा गुरांसाठी केला चारा

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** यंदाचा पावसाळा जेमतेम असल्याने गुरासाठी चाऱ्याची चिंता शेतकरी (बळीराजा) ला सतवत असून सोंगणीवर आलेली उभी मकाचा चारा करण्याचा सपाटा शेतकऱ्यांनी चालवला आहे. यंदा पावसाळा संपत आला तरी अर्धा पाऊस झाला नाही. तर जेमतेम पावसावर खरिप पिक हंगाम सुरु असून तुरळक पावसावर खरिप पिके हिरवीगार टवटवीत फडफडताना दिसत असली तरी पिके वाढली परंतु ऐन फुलाऱ्यात व कणसात दाने भरण्यावेळी पावसाने खंड दिल्याने मका बाजरी कापुस तुर भुईमूग सोयाबीन पिके जागीच खुटून दाने भरणा प्रक्रिया थांबली आहे. त्यात पुन्हा अधुनमधून पावसाच्या रिपरिप मुळे पिके टवटवीत हिरवीगार फडफडताना दिसत आहे खरे परंतु मका बाजरी पिकात दाने भरत नाही व पावसाअभावी चारा टंचाई आहेच त्यामुळे भविष्यात गुरांना चाऱ्याची गरज असल्याने सावंगी सर्कलमध्ये शेतकऱ्यांनी मका काढण्याऐवजी उभ्या हिरवीगार मका पिकांचे कुट्टी चारा करण्याचा सपाटा लावला असल्याचे चित्र आहे.





## धुळे महानगरतर्फे मतदान नोंदणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगर युवासेने तर्फे युवासेना सचिव माननीय वरून सरदेसाई साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आज एस.एस.व्ही.पी.एस. कॉलेज येथे अठरा वर्षावरील युवक युवतींची मतदान नोंदणी मोठ्या प्रमाणात करण्यात आली या कार्यक्रमात जवळपास 250 ते 300 युवक व युतीने मोठ्या उत्साहात मतदान नोंदणी शिबिरात भाग घेतला. आपला देश हा कसा सुरक्षित लोकांच्या हातात जाईल बेरोजगारी मुक्ती कडे कसा जाईल यासाठी आपला एक मतदान किती महत्वपूर्ण आहे याचे महत्व युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांमार्फत युवक युवतींना सांगण्यात आले. येणाऱ्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीत आपण आपले मतदान देशाच्या सुरक्षतेसाठी, बेरोजगारी मुक्ती, चांगले एज्युकेशन देणाऱ्या व संरक्षणाच्या दृष्टीने चांगल्या लोकांच्या हाती देण्यासाठी युवक युवतींनी संकल्प केला. वरील कार्यक्रमाचे आयोजन युवासेनेचे महानगरप्रमुख मनोज जाधव. सिद्धार्थ करंकाळ यांनी केले होते.
यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख हरीश माळी, विस्तारक तथा उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे,युवती अधिकारी सोनी ताई सोनार, प्रसिद्धी प्रमुख सिद्धेश नाशिककर,विभाग अधिकारी जयेश फुलपगारे,देवपूर शहर अधिकारी तुषार सातपुते,शुभम फुलपगारे,अक्षय मोरे तसेच युवक व युवती मोठया संख्येने उपस्थित होते.




महाराष्ट्र Business Katta












# आनंदाचा शिधा नाही आनंदाचे शिक्षण पाहिजे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतात लोकशाही असली तरीही सत्तेत बसलेले लोकशाही व लोककल्याणाला न माणणारी लोक बसले असल्याने लोकांना लोकशाही फक्त निवडणूक काळापुरती सांगितली जाते. हल्ली काही वर्षांपासून तेही बंद होत झाले आहे. लोकशाही म्हणजे केवळ जाती धर्माच्या नावाखाली जातीधर्माच्या उमेदवारांना निवडून आणणे आणि निवडून आल्यावर त्याने कोणतेही प्रकारचे कामे केले नाही तरीही त्यांच्या विरोधात न बोलणे  याला लोकशाही म्हणत नाहीत. लोकशाहीचा सरळ अर्थ असाच आहे की देशातील सरकार हे लोकांनी मिळून बनलेले असेल आणि लोकांकडून लोककल्याणाचे काम केले जातील. परंतु देशात प्रत्यक्ष बघितले तर सरकार लोक बनवत नाही आणि लोककल्याणाचे काम करत नाहीत.  हे राज्यकर्त्यांनी लोकशाही व लोकांसोबत केलेली बदमाशी आहे. ठरावीक लोकच प्रत्यक्ष पणे देशाला चालवताना दिसत आहेत. जे सत्तेत असतात त्यांना समस्या नसतात.**

जर लोक सत्तेत असते, लोकांसाठी सरकार असते तर लोकांच्या समस्या राहिल्याच नसत्या. भारतीय संविधानाने केवळ देशाला लोकशाहीच दिली नाही तर हजारो वर्षांपासून एकाच वर्णाने स्वतः वर्चस्व कायम राहुन इतरांच्या टाळूवरचे लोणी खाता यावे म्हणून विषमता पाखंड अंधविश्वास पसरवून शिक्षण, मान सन्मान, स्वाभिमान, हक्क अधिकार या पासून लोकांना दुर नेऊन लोकांना माणसिक गुलाम बनवले गेले. मानसिक गुलाम जागृत झाला तर वर्चस्वाची दुकानदारी बंद होऊन सर्व सामान्य लोकांच्या टाळूवरचे लोणी खाता येणार नाही म्हणुन येथील लोकांना शिक्षण, हक्क अधिकार याचा गंधही मिळू नाही आणि यांनी जागृत होऊन तर्कवादी होऊन चिकित्सा करू नये म्हणून लोकांना अनेक समस्येमध्ये गुरफटून ठेवल्या गेले. परंतु भारतीय संविधानाने ही संपूर्ण व्यवस्था उलथून टाकुन समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, स्वाभिमान, मान सन्मान शिक्षण, आणि विकासाची संधी निर्माण करून दिली. यामुळे ज्यांना घर नव्हते, गावकुसाबाहेर कुठेतरी पाल होते, माणसाला माणसाचा विटाळ होता असे लोक अधिकारी होऊ लागले, माणस माणसा सोबत बसु लागले. अन्याय अत्याचार, सामाजिक न्याय, महिला हक्क अधिकार यावर बोलायला लागले. सामाजिक व आर्थिक उन्नती व्हायला मदत होऊ लागली. परंतु विषमतेने बरबटलेल्या लोकांना हे सहन होत नाही. म्हणून हजारो वर्षांपासून ज्यांनी जे शिक्षण हक्क अधिकार सत्ता व संपती मधील भागिदारी नाकारली होती ते मानसिक दृष्टीने हिन असलेले लोक आजही शिक्षण रोजगार बंद व्हावा व सत्ता व संपत्ती विशीष्ट वर्णाच्या हातात जावी म्हणून राजकीय शक्तीचा चुकिच्या पद्धतीने वापर करत आहेत. आणि पुन्हा लोकांना शिक्षण रोजगार ह्या गोष्टी बाजूला सारून लोकांना भावनिक व धार्मिक बनवले जात आहे. लोकांना पाहिजे त्या बाबी न देता भलत्याच बाबी सरकार लोकांना देऊन त्यांचे लक्ष मुख्य मुद्यावरून भरकवट आहे. आम्ही विकासाच्या गप्पा मारणारे लोक अजून पोटाचा प्रश्न सोडवू शकलो नाही. असे सरकाराचेच मत आहे. म्हणजे एकिकडे देशातील जनता उपाशी राहते. हाताला काम नसल्याने व योग्य रोजगार नसल्याने अनेक समस्या निर्माण केल्या गेल्या. जखम करून त्यावर फुकंर मारण्याचे काम सरकार करत आहे. जसे शिक्षण, रोजगार महागाई यावर कोणतेही सरकार बोलत नाही. शासकीय नोकर भरती बंद करून खाजगी कंपनी मार्फत भरती करण्याचा निर्णय हा देशाला कंगाल बनवण्यासाठी घेतलेला निर्णय आहे. या बाबीवर कोणीच बोलत नाही. आम्ही खुप मोठा विकास करून लोकांचे राहणीमान बदलले असे बोलणारे राज्यकर्ते शंभर रुपयात आनंदाचा शिधा गोरगरीब जनतेला देऊन जनतेवर उपकार केल्या सारखे पाकीटावर राज्यकर्ते लोकांचे फोटो ही लावतात. मुळात राज्यकर्ते लोकांचे फोटो आनंदाचा शिधा यावर लावतात कशाला हेच कळाले नाही. शंभर रुपयात आनंदाचा शिधा घ्या. कारण तुम्ही स्वतः च्या घरी पौष्टिक अन्न सुद्धा खाऊ शकत नाही अशी वेळ आम्हीच आणली असे तर सरकार ला सांगायचे नाही ना? हा प्रश्न पडतो. कारण जनतेचा सर्व पैसा राज्यकर्ते फस्त करून टाकतात. लोकांना काहीच मिळू देत नाहीत. विकासाच्या व कामाच्या गप्पा करणारे आणि निवडणुकी पुरते हात जोडणारे बदमाश लोक जनतेच्या पैशाचा जनतेला कधीच हिशोब देत नाहीत. आनंदाचा शिधा देऊन दोन घास गोरगरीब लोकांना खायला मिळावे म्हणून योजना सुरू करावी लागली याचाच दुसरा अर्थ देशात फक्त बेरोजगारीच नाही तर उपासमारी ही आहे हे विसरून चालणार नाही. आनंदाचा शिधा देताना राज्यकर्त्यांचे पाकिटावर हसत फोटो कशासाठी आहेत. राज्यकर्ते लोक जनतेचे नोकर आहेत, जनतेच्याच पैशाने आनंदाचा शिधा जनतेला दिला जातो. मग पैसा मालकाचा अर्थात जनतेचा असताना जनसेवकांची जाहिरात कशाला? आणि आनंदाचा शिधा द्यायचाच तर मालकाने सेवकांला द्यायला पाहिजे. म्हणजे जनतेने राज्यकर्ते लोकांना द्यायला पाहिजे. राज्यकर्ते लोकांनी जनतेला आनंदाचा शिधा देऊन कमकुवत व लाचार बनवु नये. मोफत किंवा कमी भावात खाद्यपदार्थ सरकारने द्यावे ही मागणीच लोकांची नाही. लोकांची मागणी आहे ती म्हणजे शिक्षण आणि शिक्षणाच्या माध्यमातून रोजगार. शिक्षण देऊन त्या माध्यमातून रोजगार निर्मिती केली तर आनंदाचा शिधा सरकार ला देण्याची वेळ येणार नाही. सर्व जन पौष्टिक अन्न खाऊन निरोगी राहतील. परंतु कोणतेही सरकार शिक्षण व रोजगार यावर बोलायला तयार नाही. अगोदरच्या सरकारने शिवभोजन थाळी दहा रुपायात देऊन लोकांची थट्टा करून लाचार बनवण्याचा प्रयत्न केला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव नेमकं द्यायचे कशाला याचेही भान सरकारला राहले नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात जनता सुखी होती. अन्नधान्याची कमी नव्हती. स्वाभिमानाने मेहनतीची पोटभर भाकर खात होती. परंतु गरिबांसाठी सुरू केलेल्या थाळीला नाव छत्रपती शिवाजी महाराज या महान राज्याचे देऊन सरकारने पुन्हा वैचारीक भेद केला. लोकांना केवळ मोफत व कमी दरात खाण्याची व्यवस्था न करता शिक्षण व रोजगाराची व्यवस्था करून योग्य बाजार भाव उपलब्ध करून दिले तर लोक बाजार भावानुसार अन्नधान्य खरेदी करतील. परंतु सरकार ला माहिति आहे जनतेचा पैसा आपणच हडप करतो. आणि लोककल्याणकारी राज्य असल्याने काही काम जनतेसाठी केल्याचे दाखवावे लागतात म्हणून शिव भोजन थाळी दहा रुपये, आनंदाचा शिधा शंभर रुपये आणि मासिक राशन फुकट दिले जाते. लोकांना फुकट व अल्पदरात अन्नधान्य देऊन आळशी बनवण्याचे काम सरकार करत आहेत. लोकांच्या मागण्यावर लक्ष न देता त्यांची दिशाभूल करून जनतेच्या समस्या वाढवण्याचे काम सतत होत आहे. शाळेचे खाजगीकरण करून गोरगरीब लोकांचे शिक्षण बंद करण्याचा डाव सरकारने आखला आहे. खाजगीकरणाच्या नावाखाली शिक्षणाचा व्यापार करायचा, शिक्षण महाग करून सर्वसामान्य लोकांनी मुलांना शिकवु नये अशी परिस्थिती निर्माण केली गेली. आणि एवढेही करून शिकवलेच तरी त्यांना कायमस्वरूपी नोकरी मिळू नये म्हणून नोकरीचे खाजगीकरण करण्यात आले. म्हणजे लोकांना अडाणी ठेवून, मोफत खायची सवय लाऊन लाचार बनवायचे. लाचार लोकांना गुलाम बनवून त्यांच्या टाळुवरचे पुन्हा लोणी खायचे या साठीच हा सर्व खटाटोप सुरू केला आहे. आमदार खासदार जन सेवक असुन मालकाला च लुटले जाते, नैतिकता कायम न ठेवता जनकल्याणाचे काम जाणीव पुर्वक टाळले जातात. लोकांना शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, कायदा व सुव्यवस्था पाहिजे आणि सरकार मात्र शिक्षण आणि रोजगार कमी करून लाचाराची व गुलामची फौज निर्माण करून फुकट खाण्याची सवय लावत आहेत. हाताला कायमस्वरूपी काम व गुणवत्ता पुर्ण शिक्षच दिले तर लोक स्वतः चा संसार स्वतः करून व स्वाभिमानाने जिवन जगु शकतात. परंतु स्वाभिमान कमी होण्यासाठी नोकरी कमी करून शिक्षण महाग केले जाते आणि पोटभर मिळणार नाही असा शिधा दिला जाते. लोकांना शिक्षण व रोजगार पाहिजे सरकार शिधा देऊन मोकळे होत आहे. हे भविष्यासाठी खुप घातक आहे. बदमाश पोटभरु राज्यकर्त्यांना वठणीवर आणायचे असेल तर ईव्हीएम ला विरोध करून बँलटपेपर वर निवडून घेण्यासाठी लढा उभारणे आवश्यक आहे. तेव्हा आपले शिक्षण, रोजगार, हक्क अधिकार  संरक्षित होऊन स्वाभिमान जागृत राहील आणि शिक्षणाच्या बदल्यात शिधा देणार नाही.




# भारत-कॅनडामधील वाढता तणाव



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**मागच्या काही वर्षांपासून भारत आणि कॅनडामधील संबंध बिघडत चालले होते. खलिस्तानी समर्थकांना कॅनडामध्ये आश्रय दिला जातो, हे दोन्ही देशातील संबंध बिघडण्यामागच मुख्य कारण आहे. आता दोन्ही देशातील तणाव टिपेला पोहोचला आहे. नुकत्याच संपन्न झालेल्या जी २० परीषदेसाठी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो भारतात आले होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींसमवेत हस्तांदोलन व परस्पर सहकार्याची चर्चा करताना ते दिसून आले होते. कॅनडाला पोहोचल्यावर अवघ्या १० दिवसातच त्यांनी भूमिका बदली असून भारता विरोधात गरळ ओकण्यास सुरुवात केली आहे. जस्टिन ट्रुडो यांनी दहशतवादी संघटना खलिस्तानी टायगर फोर्सचा प्रमुख दहशतवादी हरदीप सिंह निज्जरच्या हत्या प्रकरणी मोठं विधान केलंय.**

जस्टीन ट्रुडो यांनी सांगितलं की, भारत सरकार आणि खलिस्तानी दहशतवादी निज्जर यांच्या कनेक्शनचा तपास देशाच्या सुरक्षा संस्था करत आहेत. ओटावात हाउस ऑफ कॉमन्सला संबोधित करताना जस्टीन ट्रुडो म्हणाले की, कॅनडाची सुरक्षा संस्था भारत आणि निज्जरच्या हत्या प्रकरणाचे कनेक्शन आहे का याचा वेगाने तपास करत आहे. भारत सरकारचे म्हणणे आहे की कॅनडा आपल्या भूमीवरुन खलिस्तानी कारवायांना आळा घालण्यात अपयशी ठरला आहे. इतकंच नाही तर त्यांना उघडपणे पाठिंबाही दिला आहे. ट्रूडो यांनी केलेल्या आरोपांनंतर कॅनडाच्या वेगवेगळ्या राज्यांमध्ये खलिस्तान समर्थकांनी कट रचण्यास सुरूवात केली असून यामुळे तेथे राहणाऱ्या भारतीय नागरिकांसोबतच डिप्लोमॅट्स आणि भारतीय दूतावासाला देखील मोठा धोका निर्माण झाला आहे. पंतप्रधान ट्रूडो यांच्या वक्तव्यानंतर खलिस्तानी समर्थकांनी सोमवारी ब्रिटिश कोलंबियातील एका गुरुद्वारामध्ये बैठक घेतली आणि भारताविरोधात मोठा कट रचण्याची तयारी सुरु केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरू नानक शीख गुरुद्वारा कौन्सिल ऑफ सरे, ब्रिटिश कोलंबियाचे प्रवक्ते सरदार मोनिंदर सिंग यांनी या बैठकीचे नेतृत्व केले. यावेळी, मोनिंदर सिंग आणि इतर काही खलिस्तानी आणि अतिरेक्यांनी एकत्रितपणे २५ सप्टेंबर रोजी कॅनडातील भारतीय समर्थक, येथील डिप्लोमॅट्स आणि त्यांच्या कुटुंबियांसह सर्व कॅनडाचे हायकमिशन आणि वाणिज्य दूतावासांसमोर मोठ्या प्रमाणात निदर्शने करण्याची तयारी केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अशीही माहिती आहे की या संपूर्ण निदर्शनांना कॅनडाचे अनेक माजी खासदार,नेते तसेच काही अतिरेकी आणि खलिस्तान समर्थक पुढे घेऊन जात आहेत. जस्टिन ट्रुडो यांनी भारतीय शेतकऱ्यांच्या आंदोलनाला दिलेल्या पाठिंब्यावरून ३ वर्षांपुर्वी सुद्धा असाच वाद निर्माण झाला होता. यावेळी जगात कुठेही शांतीपूर्ण मार्गानं आंदोलन होत असेल तर कॅनडा नेहमीच त्यांच्या अधिकारासाठी त्यांच्यासोबत उभा असेल. या प्रकरणांत तोडगा काढण्याच्या दिशेनं उचललेले पाऊल आणि संवादांप्रती आम्ही नेहमीच आशादायी राहू असं जस्टिन ट्रुडो यांनी म्हटलं होतं. भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं दिल्लीतील कॅनडाच्या उच्चायुक्तांना पाचारण करून, इतर देशांचा भारताच्या अंतर्गत बाबींत केल्या जाणारा हस्तक्षेप बद्दल समज दिली होती. शेतकरी आंदोलनाच्या मुद्यावर कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो आणि इतर नेत्यांच्या वक्तव्यांवर भारतानं नाराजी व्यक्त केली होती. भारताच्या अंतर्गत बाबींत हस्तक्षेप सहन करण्यायोग्य नसल्याची तिखट प्रतिक्रिया भारतानं दिली होती. तरीसुद्धा जस्टिन ट्रुडो आपल्या मतावर ठाम होते. कोण आहे हरदीप सिंह निज्जर? हरदीप हा भारतामध्ये वॉन्टेड दहशतवादी होता. भारतात वाँटेड असलेल्या निज्रचा १८ जून रोजी कॅनडातील ब्रिटिश कोलंबिया प्रांत असलेल्या सरे शहरात या वर्षी जूनमध्ये पार्किंगमध्ये गोळी घालून हत्या करण्यात आली. त्याचा जन्म पंजाब राज्यातील जालंधरमध्ये असलेल्या हरसिंगपूर गावात झाला होता. त्यानंतर तो १९९५ मध्ये कॅनडामध्ये स्थलांतरित झाला होता. त्याने कॅनडाचे नागरिकत्व घेतले होते. निज्जर सरेमध्ये गुरु नानक सिख गुरुद्वाराचा अध्यक्ष होता. गेल्या काही वर्षांत तो बंदी घातलेल्या फुटीरतावादी संघटनांच्या संपर्कात आला. त्यानंतर तो  हिंसाचार, विंध्वसक कारवायामुळं चर्चेत आला होता. कॅनडात स्थित असलेला निज्जरवर भारतातील दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपा होता. निज्जर हा २००७ मध्ये लुधियानामधील शिंगार सिनेमा बॉम्बस्फोट तसेच २००९ मध्ये पटियाला येथे राष्ट्रीय शीख संघाचे अध्यक्ष रुल्डा सिंग यांच्या हत्येसह अनेक हाय-प्रोफाइल गुन्ह्यांमध्ये अडकला होता. त्यामुळे तो सुरक्षा यंत्रणेच्या रडारवर होता. भारताविरुद्ध कट रचण्यात आणि दहशतवादी कारवाया केल्याबद्दल एनआयएने त्याच्याविरुद्ध आरोपपत्रदेखील दाखल केले होते. भारताच्या राष्ट्रीय तपास संस्थेनं २०२२ मध्ये त्यांच्या नावावर १० लाख नावांचं बक्षीस ठेवलं होतं.  काय आहे खलिस्तान चळवळ ? खलिस्तान समर्थक खलिस्तान नावाच्या वेगळ्या देशाची मागणी करत आहेत. कॅनडा, ब्रिटन, अमेरिका आणि ऑस्ट्रेलियामध्ये स्थायिक झालेल्या शीख स्थलांतरित ही मोहीम परदेशी मदतीने चालवत आहे. भारताचे तुकडे करण्याचा मानस त्यांचा आहे. पंजाब राज्य आणि आजूबाजूच्या हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यांचे विलीनीकरण करून खलिस्तान देश तयार करायचा आहे. यात पाकिस्तानमधील पंजाबचा देखील समावेश आहे. खलिस्तानची राजधानी लाहोर करण्याचा खलिस्तान वाद्यांचा मानस आहे. खलिस्तान हा शब्द पहिल्यांदा १९४० मध्ये वापरण्यात आल्याचे सांगितले जाते. १९५५ मध्ये शीखबहुल राजकीय पक्ष अकाली दलाने भाषेच्या आधारावर राज्याच्या पुनर्रचनेसाठी चळवळ सुरू केली. अकाली दलाने राज्याचे पंजाबी आणि बिगर पंजाबी भाषिक भागात विभाजन करण्याची मागणी केली. जेव्हा ही मागणी वाढू लागली. तेव्हा १९६६ मध्ये इंदिरा गांधींनी पंजाबचे तीन भाग केले आणि पंजाब, हरियाणा राज्य आणि चंदीगडला केंद्रशासित प्रदेश बनवले. पंजाब सरकारला संरक्षण, परराष्ट्र, दळणवळण आणि चलन वगळता सर्व अधिकार देऊन स्वायत्त करण्याची मागणीही अकाली दलाने केंद्र सरकारकडे केली होती, ती इंदिराजींनी फेटाळली होती. ९८० च्या दशकात खलिस्तान चळवळीने पुन्हा एकदा वेग घेतला होता. त्यावेळच्या दमदमी टकसालचे प्रमुख जर्नेलसिंग भिंद्रनवाला यांनी याचे नेतृत्व केले. भिंद्रनवाले यांच्या नेतृत्वाखाली खलिस्तान समर्थकांनी शस्त्रे गोळा करून सुवर्ण मंदिरात आश्रय घेतला. या अतिरेक्यांना हुसकावून लावण्यासाठी केंद्र सरकारने १ जून १९८४ रोजी ऑपरेशन ब्लू स्टार मोहीम राबविली. यामध्ये लष्कराचे ८३ जवान आणि ४९२ नागरिकांचा मृत्यू झाला. या कारवाईत भिंद्रनवाला मारला गेला आणि सुवर्ण मंदिर अतिरेक्यांपासून मुक्त झाले. या घटनेमुळे जगभरातील शीख समुदाय दुखवला गेला. ऑपरेशन ब्लू स्टारमुळे इंदिरा गांधींना शीखविरोधी मानले गेले. त्यामुळे इंदिरा गांधी यांच्या अंगरक्षकांनी त्यांची हत्या केली. १९८४ मध्ये ऑपरेशन ब्लू स्टार आणि त्यापूर्वी ऑपरेशन ब्लॅक थंडर (१९६८ आणि १९८८) नंतर खलिस्तान चळवळ दडपली गेली. सध्या भारतातील खलिस्तान चळवळ जवळपास संपुष्टात आली आहे. पंजाबच्या शहरी किंवा स्थानिक लोकसंख्येमध्ये त्याचा प्रभाव शून्य आहे. परंतु कॅनडा, ब्रिटन किंवा अमेरिकेत राहणाऱ्या शीखांकडून या चळवळीला अरधिक रसद तसेच वैचारिक पाठिंबा दिला जत आहे. सध्या भारतातील खलिस्तान चळवळ जवळपास संपुष्टात आली आहे. पंजाबच्या शहरी किंवा स्थानिक लोकसंख्येमध्ये त्याचा प्रभाव शून्य आहे. परंतु कॅनडा, ब्रिटन किंवा अमेरिकेत राहणाऱ्या शीखांकडून या चळवळीला अरधिक रसद तसेच वैचारिक पाठिंबा दिला जत आहे.  भारत-कॅनडा संबंध कधी ताणले गेले ? भारतानं मे १९७४ मध्ये राजस्थानात पोखरण परमाणू परीक्षण केलं. यामुळे कॅनडा सरकार नाराज झाली होती. भारताला शांती प्रस्थापित करण्यासाठी परमाणू ऊर्जासाठी रिएक्टर्स दिले होते. परंतु भारतानं कॅनडाच्या रिएक्टर्सचा वापर पोखरण परमाणूसाठी केला. त्यावेळी पियरे ट्रूडो कॅनाडाचे पंतप्रधान होते आणि ते भारतावर नाराज झाले होते. त्यानंतर भारत आणि कॅनाडासोबतचे संबंध खराब होऊ लागले. त्याचवेळी भारतात खालिस्तान आंदोलन वाढू लागलं होतं. राजकीय शोषण होत असल्याचं सांगत अनेक शिख लोकांनी कॅनाडामध्ये आश्रय घेतलं होतं. यात एअर इंडियाच्या विमानात बॉम्ब विस्फोट करणारा खालिस्तानी दहशतवादी तलविंदर सिंह परमार देखील होता. दरम्यान इंदिरा गांधीच्या सरकारनं परमार यांचे भारतात प्रत्यार्पण करण्यात यावे अशी मागणी केली होती. परंतु पियरे टुडो यांनी त्यास नकार दिला. त्यापासून भारत आणि कॅनाडाच्या संबंधात तेढ निर्माण झाली आहे. नाडानं जस्टीन ट्रूडो सरकारनं भारतासोबतच्या व्यापार कारण न सांगता बंद केला होता. त्यानंतर कॅनाडातील वाढता खलिस्तानी संघटनेवर ट्रूडो सरकार काही करत नसल्यानं भारतानं कठोर शब्दात तेथील सरकारलं सुनावलं होतं. भारत-कॅनडा व्यापारावर परिणाम होण्याची शक्यता : या दोन्ही देशातील संबंध खराब असले, तरी दोन्ही देशातील व्यापार मात्र चांगला आहे. कूटनीतिक स्तरावर जो तणाव निर्माण झालाय, त्याचा परिणाम आता व्यापारावर होणार आहे. भारत आणि कॅनडामध्ये आयात-निर्यात बरोबरीची आहे. वित्त वर्ष २०२२-२३ मध्ये भारताने कॅनडाला ४.१० अब्ज डॉलरच सामान निर्यात केलं. तेच कॅनडाने भारताला २०२२-२३ मध्ये ४.०५ अब्ज डॉलरच सामान निर्यात केलं. भारत आणि कॅनडामध्ये व्यापार प्रक्रिया सहजसोपी असल्याने भारताने मोठी गुंतवणूक सुद्धा केली आहे. कॅनडाच्या पेंशन फंडाने भारतात ५५ अब्ज डॉलरची गुंतवणूक केलीय. कॅनडाने वर्ष २००० पासून आतापर्यंत भारतात ४.०७ अब्ज डॉलरची थेट गुंतवणूक केलीय. भारतात सध्या ६०० कॅनडीयन कंपन्या काम करत आहेत. एक हजार कंपन्या भारतात एन्ट्री करण्यासाठी रांगेत आहेत. भारतीय आयटी कंपन्यांना कॅनडामध्ये मोठा व्यवसाय आहे. त्याशिवाय सॉफ्टवेअर, नॅच्युरल रिसोर्सेज आणि बँकिंग सेक्टरमध्ये भारतीय कंपन्या सक्रीय आहेत. कॅनडा भारताकडून आभूषण, महागडे दगड, फार्मा प्रोडक्ट, रेडिमेड गारमेंट, ऑर्गेनिक केमिकल्स, लाइट इंजीनियरिंग सामान आणि आयर्न अँड स्टील प्रोडक्ट प्रामुख्याने विकत घेतो.

# जग सौर, पवन, हायड्रोजन, जैवइंधन विकसित करण्यात व्यग्र



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारतात आढळणाऱ्या हिरव्या अवशेषांचा मोठा भाग पशुधनावर आधारित अवशेषांच्या स्वरूपात अस्तित्वात आहे. जैवइंधन, वीज आणि सेंद्रिय खत निर्मितीसाठी लागणारे सर्व घटक पशुधनातून दररोज गोळा होणाऱ्या सेंद्रिय कचऱ्यामध्ये आढळतात. जर आपण जैवइंधनासाठी कच्चा माल म्हणून शेतीचे अवशेष विकसित केले तर प्रदूषणामुळे होणारे आजार कमी होतील. वाढत्या हवामान संकटात उर्जेचे केवळ अक्षय स्रोतच शाश्वत आहेत. पर्यावरणीय संकटादरम्यान, जग सौर, पवन, हायड्रोजन आणि जैवइंधन विकसित करण्यात व्यस्त आहे. जीवाश्म नसलेल्या इंधनांप्रमाणे हे अतुलनीय आणि स्वच्छ इंधन आहेत.**

यापैकी, जैवइंधन हे ऊर्जेचे एक आकर्षक स्त्रोत मानले जाते कारण ते प्रामुख्याने पिके आणि सेंद्रिय कचरा यांसारख्या कृषी कचऱ्यापासून तयार केले जातात.

कृषीप्रधान देशांसाठी हे निसर्गाने दिलेल्या वरदानासारखे आहे. आज अमेरिका इथेनॉल उत्पादनात पंचावन्न टक्के वाटा घेऊन अग्रेसर आहे. तर ब्राझील २७ टक्के गुणोत्तरासह दुसऱ्या क्रमांकावर आहे.अमर्याद क्षमता असलेल्या भारताचा वाटा मात्र केवळ तीन टक्के आहे. 2022 पर्यंत देशाची इथेनॉल उत्पादन क्षमता 947 कोटी लिटरवर पोहोचली आहे. इथेनॉल, बायोडिझेल आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस (CBG) ही लोकप्रिय जैवइंधन उत्पादने आहेत. इथेनॉल हा एक प्रकारचा अल्कोहोल आहे, जो पेट्रोल आणि डिझेलसह मिश्रित उत्प्रेरक (ब्लेंडिंग एजंट) म्हणून वापरला जातो. पेट्रोलमध्ये मिसळल्यास त्याची गुणवत्ता वाढते. त्यामुळे कार्बन उत्सर्जन कमी होते. अन्नधान्यांमध्ये असलेल्या साखर आणि स्टार्चपासून पहिल्या पिढीचे इथेनॉल तयार केले जाते.

भारतात तांदूळ, ऊस आणि मक्यापासून इथेनॉल बनवण्याची परवानगी आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या पिढीतील इथेनॉल हे अन्न नसलेल्या अवशेषांपासून (शेती आणि जनावरांचे अपशिष्ट) तयार केले जाते. सूक्ष्म जीवाणू आणि शैवाल यांच्यापासून तिसऱ्या पिढीचे इथेनॉल तयार करण्यावर संशोधन सुरू आहे. पारंपारिकपणे सेंद्रिय कचऱ्याचे इथेनॉलमध्ये रूपांतर करण्यासाठी साधी फर्मेंटेशन ('किण्वन' ) प्रक्रिया प्रभावी ठरते. या दरम्यान सूक्ष्मजीव वनस्पतींच्या स्टार्चचे विघटन करून इथेनॉल तयार करतात. बायोडिझेल हा देखील जैवइंधनाचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. हे वनस्पती तेल आणि चरबीपासून तयार केले जाते. हॉटेल उद्योगात वापरण्यात येणारे टाकाऊ खाद्यतेल बायोडिझेल बनवण्यासाठीही वापरले जाते.

देशाची इंधनाची गरज भागवण्यासाठी आपल्याला 80 टक्के कच्चे तेल आयात करावे लागते. नैसर्गिक वायूसाठी पन्नास टक्के आयात अवलंबित्व आहे. देशात 31.5 कोटी एलपीजी सिलिंडर आणि 1.5 कोटी पीएनजी कनेक्शन आहेत. आपला ऊर्जेचा वापर दरवर्षी तीन टक्के दराने वाढत आहे. अशा स्थितीत जैवइंधन हा एक प्रमुख अक्षय ऊर्जा संसाधन मानला जात आहे. केंद्राने त्याच्या विकासासाठी अनेक मोठी पावले उचलली आहेत. इथेनॉल मिश्रण कार्यक्रम 5 जून 2021 रोजी सुरू झाला. राष्ट्रीय जैवइंधन धोरण 2018 ला जून 2022 पर्यंत सुधारित केले. यामध्ये 2030 पर्यंतचे 20 टक्के इथेनॉल मिश्रणाचे (E-20) उद्दिष्ट 2025 पर्यंत कमी करणे ही सर्वात महत्त्वाची बाब आहे.नोव्हेंबर 2022 पर्यंत दहा टक्के इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट नियोजित वेळेपूर्वी गाठले गेले आहे. त्यामुळे 46 हजार कोटी रुपयांची बचत झाली आहे. सरकारने उद्योग विकास आणि नियमन कायदा 1951 मध्ये सुधारणा करून इथेनॉलची देशव्यापी वाहतूक सुलभ केली आहे. एका अहवालानुसार, देशात 1350 पेट्रोल पंप आहेत जे ई-20 इंधन पुरवत आहेत. भारताने एअर टर्बाइन इंधनामध्ये एक टक्के इथेनॉल मिश्रणाचा यशस्वीपणे वापर केला आहे.

सध्या कच्च्या तेलाच्या आयातीवर सुमारे 9 लाख कोटी रुपयांची परकीय चलन साठा खर्च होतो. इथेनॉल मिश्रणाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने त्यावरील जीएसटी अठरा टक्क्यांवरून पाच टक्क्यांवर आणला आहे. जैवइंधन धोरण लागू करण्याबरोबरच उत्तर प्रदेश आणि तामिळनाडू संबंधित पायाभूत सुविधांमध्ये पंचाहत्तर हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करत आहेत. राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगडसह अनेक राज्यांनी जैवइंधनाशी संबंधित नियम आणि प्राधिकरणे स्थापन केली आहेत. छत्तीसगडमधील कबीरधाम जिल्ह्यात सार्वजनिक-खाजगी भागीदारीसह देशातील पहिला इथेनॉल प्लांट सुरू करण्यात आला आहे. मध्य प्रदेशातील छिंदवाडा आणि बालाघाट जिल्ह्यात खासगी कंपनीने स्थापन केलेल्या प्लांटचे काम सुरू झाले आहे. केंद्र सरकारने सुरू केलेली गोबर धन योजना कच्चा माल गोळा करण्यासाठी उपयुक्त आहे.



काही राज्य सरकारांनी या दिशेने केलेल्या प्रयत्नांचे सुखद परिणाम मिळत आहेत. कुरुक्षेत्र, हरियाणात निर्माणाधीन असलेल्या पहिल्या कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्पातून वर्षाला चार लाख टन जैवइंधन तयार होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे पुढील वर्षी कर्नालमध्ये बायोगॅस प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होईल. यामध्ये दरवर्षी चाळीस हजार टन पेंढ्याचा (पराली) वापर होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांची केवळ पराली जाळण्याच्या समस्येतून सुटका होणार नाही, तर त्या बदल्यात त्यांना उत्पन्नही मिळणार आहे. सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी पानिपत (हरियाणा), भटिंडा (पंजाब), नुमालीगढ (आसाम) आणि बरगड (ओडिशा) येथे जैव शुद्धीकरण कारखाने स्थापन केले आहेत. कॉम्प्रेस्ड बायोगॅस (CBG), जैवइंधनाचा मुख्य प्रकार, नैसर्गिक वायूची हरित आवृत्ती असल्याचे म्हटले जाते. देशभरात पाच हजार सीबीजी प्लांट्स उभारले जात आहेत. सुरुवातीला, हे संयंत्र 1.5 कोटी टन कॉम्प्रेस्ड जैवइंधन (CBG) तयार करतील. शेती, जंगल, पशुसंवर्धन, समुद्र आणि नगरपालिकेतून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या मदतीने या वनस्पतींसाठी बायोगॅस तयार केला जाणार आहे. त्यामुळे तेल आणि पारंपरिक नैसर्गिक वायूवरील आपले अवलंबित्व कमी होईल.

जैवइंधन हे भारतासाठी देखील वरदान आहे कारण शेती आणि पशुधन यासाठी स्वस्त कच्चा माल पुरवतात. देशात भाताचा पेंढा, कापसाचे देठ, खराब झालेला मका, तांदूळ, लाकडाचा भुसा, बगॅसे, कसावा, कुजलेले बटाटे, ऊस, गूळ आणि मोलॅसिस यापासून इथेनॉल तयार केले जात आहे. भारतात आढळणाऱ्या हिरव्या अवशेषांचा मोठा भाग पशुधनावर आधारित अवशेषांच्या स्वरूपात अस्तित्वात आहे. जैवइंधन, वीज आणि सेंद्रिय खत निर्मितीसाठी लागणारे सर्व घटक पशुधनातून दररोज गोळा होणाऱ्या सेंद्रिय कचऱ्यामध्ये आढळतात. जर आपण जैवइंधनासाठी कच्चा माल म्हणून शेतीचे अवशेष विकसित केले तर प्रदूषणामुळे होणारे आजार कमी होतील.

या मालिकेत देशभरात बारा बायो रिफायनरीज स्थापन करण्यात येणार आहेत. कृभको गुजरातमधील हजीरा येथे 2 लाख 50 हजार लिटर क्षमतेचा बायो इथेनॉल प्लांट उभारत आहे. वेस्ट कॉर्न इथेनॉलसाठी वापरण्यात येईल. त्यामुळे अन्नधान्याची नासाडीही कमी होईल. त्यामुळे अन्नधान्याची नासाडीही कमी होईल. इथेनॉल बनवल्यानंतर उरलेला अवशेष जनावरांच्या चारा म्हणून उपयुक्त ठरेल. ते पर्यावरणात कमी कार्बन सोडते. एक कोटी लिटर इथेनॉल अंदाजे वीस हजार टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन कमी करते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, कानपूरच्या अहवालानुसार, ग्रामीण भागात हिरव्या कचऱ्यासाठी खरेदीदार नसल्यामुळे शेतकरी शेतीचा कचरा जाळतात. या क्षेत्रात सहकारी संस्थांची क्षमता आणि त्यांच्या कौशल्याचा लाभ घेतला पाहिजे. तज्ज्ञांच्या मते, जैव-अवशेषांवर आधारित ऊर्जा संयंत्रे ग्रामीण भागात विकेंद्रित पद्धतीने स्थापन केली पाहिजेत.

पंचायत स्तरावर बायोगॅस संयंत्रे उभारल्यास हिरवे अवशेष गोळा करण्याचा खर्च कमी होईल. यासोबतच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर उत्पादक आणि वितरकांची यंत्रणाही समांतर विकसित व्हायला हवी. हिरव्या कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण करण्याशी संबंधित संरचना क्लिष्ट आणि खर्चिक असल्याने लोकप्रिय होत नाहीत. या दिशेने, जर जागतिक जैवइंधनाचे सदस्य देश तंत्रज्ञान, वित्त आणि कौशल्याची देवाणघेवाण करण्यात यशस्वी झाले तर भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांना सर्वाधिक फायदा होईल. 2070 पर्यंत जागतिक अर्थव्यवस्था निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनापर्यंत पोहोचणार असेल तर जैवइंधन हा एक महत्त्वाचा घटक असेल.

# संसदेचे विशेष अधिवेशन हे अर्थपूर्ण चर्चेचे माध्यम बनले पाहिजे



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमृत्मोहोत्वी वर्षा निमित्ताने संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे.भारतीय संसदीय इतिहासातील आठवे विशेष अधिवेशन नव्या संसद भवनात सुरू झाले आहे. संसदेचे कामकाज सुरळीत चालवणे ही विरोधी पक्षाची जबाबदारी नसून सत्ताधारी पक्षाची जबाबदारी आहे. पण त्यासाठी सत्ताधाऱ्यांपाशी जी संहिष्णूता व सामंजस्य असायला हवे, त्याचा मागल्या काही वर्षात संपुर्ण अभाव दिसून आलेला आहे. संसद हे लोकशाहीचे मंदीर आहे असे मानले जाते. त्याचा अर्थच तिथे सत्ताधारी व विरोधकात मतभेद असले तरी सुसंवाद व्हावा, असाच हेतू असतो. संवादातून मतभेद दूर करण्याला लोकशाही म्हणतात.**

संसदीय मार्गाने वा संवादातून राजकारण करण्यापेक्षा आक्रमक विसंवादातून राजकारण करण्याचा पवित्रा सत्ताधाऱ्यांनी व विरोधकांनी पहिल्या दिवसापासून घेतला याला.आदर्श म्हणायचे काय?

साधारणपणे संसदेचे अर्थसंकल्प, पावसाळी आणि हिवाळी अधिवेशने दरवर्षी होतात. पावसाळी अधिवेशन जुलै-ऑगस्टमध्ये, तर हिवाळी अधिवेशन नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये होणार आहे. दरवर्षी जानेवारीच्या अखेरीस अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होते. दोन सत्रांमध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त अंतर असू शकत नाही. सध्या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संविधान सभेपासून संसदेच्या स्थापनेपर्यंतच्या ७५ वर्षांच्या प्रवासावर विशेष चर्चेचे नियोजन सरकारने केले आहे.

ऐतिहासिकदृष्ट्या, विशेष सत्रे सहसा महत्त्वाच्या राष्ट्रीय घटनांच्या स्मरणार्थ बोलावली जातात. संसदीय इतिहासात आतापर्यंत संसदेची सात विशेष अधिवेशने बोलावण्यात आली आहेत, त्यापैकी तीन अधिवेशने जेव्हा देश ऐतिहासिक कामगिरीचा उत्सव साजरा करत होता तेव्हा बोलावण्यात आले होते. तामिळनाडू आणि नागालँडमध्ये १९७७ मध्ये आणि हरियाणामध्ये १९९१ मध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यासाठी दोनदा विशेष सत्रे आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रामुख्याने संसदेच्या ७५ वर्षांच्या वाटचालीवर चर्चा करण्यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. यावेळचे विशेष अधिवेशन हे संसदीय परंपरेचे उत्कृष्ट स्वरूप मांडण्यासाठी, तिची उत्कृष्टता वाढवण्यासाठी आणि प्रगत आदर्श बनवण्यासाठी असावे, एवढेच नव्हे तर या विषयावर गांभीर्याने चर्चा व्हायला हवी. त्यापेक्षा यावर चिंतन आणि चिंतन व्हायला हवे. कारण गेल्या काही वर्षांत संसदेतील कामकाजाची पद्धत कमी झाली आहे, हे नाकारता येणार नाही.

इतर अधिवेशनांप्रमाणे गदारोळ, असभ्य आणि अनुशासनहीन होण्याऐवजी, जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे विशेष अधिवेशन हे आपले संसदीय कामकाज कसे प्रेरणादायी आणि लोकशाही मूल्यांचे वाहक बनले पाहिजे यावर अर्थपूर्ण चर्चेचे माध्यम बनले पाहिजे. राजकीय आग्रह आणि पूर्वग्रह न ठेवता संसदीय कामकाज सन्मानपूर्वक कसे चालवले जावे यावरही चिंतन आणि चिंतन व्हायला हवे. संसदेत अर्थपूर्ण चर्चा झाल्याचे क्वचितच घडले आहे. त्यामुळे या अधिवेशनात सरकारने प्रस्तावित केलेल्या विधेयकांवर बेफिकीरपणे विरोध व्यक्त करण्याऐवजी विरोधी पक्षांनी निरोगी चर्चेसाठी तयार राहणे योग्य ठरेल. विधेयकांची रूपरेषा पाहून नकारात्मकतेची ओळख करून देण्याऐवजी सकारात्मक विचारसरणीचा अवलंब केला तरच हे घडू शकते.

भारतीय संसदेचा अमृतकाल अमृतमय बनवण्यासाठी संसदेतील आणि स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या कामगिरीवर आणि सातत्याने वाढणाऱ्या उणिवा यावर चर्चा करण्याबरोबरच त्या उणिवा आणि विसंगती दूर करण्याचा रोडमॅप तयार करायला हवा. आतापर्यंतच्या संसदीय प्रवासातून मिळालेले उपलब्धी, अनुभव, आठवणी, उणिवा आणि बोध या गोष्टींना चर्चेचे माध्यम बनवून नवीन संसदीय प्रवासासाठी प्रगत आणि आदर्श मूल्ये अंगीकारण्यासाठी सर्वानुमते तयार असले पाहिजे. संसदेतही विरोधासाठी विरोधाचेच राजकारण अधिक दिसून येते, हे दुर्दैव आहे. विरोधी पक्षांनी संसदेत चर्चा करण्यापेक्षा घोषणाबाजी, घोषणांचे फलक दाखवण्यात, सभापतींपर्यंत पोहोचण्यात आणि गदारोळ करण्यातच जास्त ऊर्जा खर्च केली. या विशेष अधिवेशनात याचा पुन्हा एकदा प्रत्यय आला.तो होवू नये .गेल्या काही वर्षांत हे सातत्याने घडत आहे आणि त्यामुळे कोणतेही महत्त्वपूर्ण काम होऊ शकले नसताना अनेक सत्रे झाली आहेत.

१८ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर या कालावधीत चालणाऱ्या या विशेष अधिवेशनात एकूण ८ विधेयके चर्चेसाठी आणि मंजूर करण्यासाठी ठेवण्यात आली आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांच्या नियुक्ती, त्यांच्या सेवा शर्ती आणि कार्यकाळ, प्रेस आणि नियतकालिकांची नोंदणी विधेयक आणि पोस्ट ऑफिस विधेयक या विधेयक-२०२३ यापैकी प्रमुख आहेत. या विशेष अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाचे कामकाज जुन्या संसद भवनात आणि उर्वरित चार दिवस नवीन संसद भवनात होणार आहे.

या अधिवेशनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मंगळवारी सकाळी दुसऱ्या दिवशी लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्व खासदारांचे ग्रुप फोटो असतील. सध्याच्या संसदेचे हे शेवटचे अधिवेशन असू शकते आणि सरकार वेळेपूर्वी लोकसभेच्या निवडणुका घेऊ शकते, अशीही शक्यता आहे.

संसदेच्या गेल्या अधिवेशनात या विषयावर चर्चा करण्याचे सरकारने अनेकवेळा मान्य केले असताना आणि अविश्वास प्रस्तावावरील चर्चेदरम्यान पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांनीही विरोधकांच्या प्रश्नांना उत्तरे दिली होती, त्यानंतर हा मुद्दा विशेषांकात उपस्थित करण्यात आला होता. सत्र. यासाठी कोणतेही औचित्य नाही. काँग्रेस आणि विरोधी पक्षांचा असा आग्रह आणि पूर्वग्रह ही नवीन गोष्ट नाही. मात्र या विशेष अधिवेशनात काँग्रेस आणि विरोधकांनी गदारोळ करण्याचे ठरवले हे दुर्दैव आहे. ज्याप्रमाणे महागाई, बेरोजगारी, चीन सीमा, दहशतवाद, निवडणुकांची स्वच्छता, या प्रश्नांवर सरकारकडून प्रश्न उपस्थित करणे आणि उत्तरे मागणे हे सुदृढ आणि जागरूक लोकशाहीचे लक्षण आहे. परंतु या किंवा इतर मुद्द्यांच्या आधारे जिथे संसदेचे कामकाज विस्कळीत करण्याच्या अटी आहेत, ते अलोकतांत्रिक आणि अशोभनीय आहे.

विशेष अधिवेशन हे लोकशाही तडजोडीसह समज विकसित करण्याचे उदाहरण ठरेल, अशी अपेक्षा आहे. स्वातंत्र्याच्या सुवर्णकाळातील संसदीय प्रवासावर चर्चा करण्यासाठी बोलावलेल्या विशेष अधिवेशनात सरकारच्या प्रत्येक पावलाला आंधळेपणाने विरोध करण्याऐवजी राष्ट्रीय महत्त्वाच्या आणि संसदीय प्रतिष्ठेच्या मुद्द्यांवर व्यापक चर्चा व्हायला हवी, जेणेकरून देशाला काही दिशा मिळेल. विकासकामांना गती मिळण्याची शक्यता आहे, पण त्याऐवजी अधिक आरोप-प्रत्यारोप करणे समर्थनीय नाही. अनेकवेळा याबाबत गतिरोध निर्माण होऊन संसदेचा बहुमोल वेळ वाया जातो. सध्याच्या वातावरणात सरकारला चर्चेला नकार देणे कठीण होईल. मात्र विरोधकांना हेही लक्षात ठेवावे लागेल की अधिक आक्रमक भूमिका घेऊन संसदेचे कामकाज विस्कळीत करण्यापुरते मर्यादित राहू नये. जेव्हा असे घडते तेव्हा लोकशाहीच्या मूळ आत्म्यावरच आघात होतो. विरोधकांनी पुढाकार घेऊन सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण करून विशेष अधिवेशन सुरळीतपणे चालवण्याचा आदर्श ठेवावा.

देशाच्या संसदेला राष्ट्रीय परिस्थितीचा निःपक्षपातीपणे आणि सकारात्मक पद्धतीने आढावा घ्यावा लागेल आणि लोकांना दिलासा देण्यासाठी तरतुदींवर विचारमंथन करावे लागेल. संसद हे केवळ विरोधी पक्ष आणि सत्ताधारी यांच्यातील चर्चेचे ठिकाण नाही तर सार्वजनिक हिताचे निर्णय घेण्याचे सर्वात मोठे व्यासपीठ आहे. यातूनच सत्ताधारी सरकारची जबाबदारी आणि जबाबदारी निश्चित केली जाते आणि गरज पडल्यास जबाबदारीही घेतली जाते, पण सत्ताधारी आणि विरोधकांची संकुचित वृत्ती आणि राजकीय स्वार्थही या सर्वोच्च लोकशाही व्यासपीठाला बळी पडतात हेही खरे. १४० कोटी लोकांसाठी एक व्यासपीठ असलेल्या देशाच्या लाचार संसदेच्या विशेष अधिवेशनात काय होईल हे सांगणे कठीण आहे, पण राजकीय पक्षांनी देशहिताच्या दृष्टीने हे विशेष अधिवेशन निश्चितच 'विशेष' केले तर बरे होईल. गरज भासल्यास त्या देशांच्या संसदेतील कामकाजाला आपला आदर्श बनवा. जिथे प्रत्येक विषयावर गंभीर आणि अर्थपूर्ण चर्चा होते. शेवटी, अमेरिका आणि ब्रिटनच्या संसदेप्रमाणे आपल्या देशात वादविवाद का होऊ शकत नाहीत?

सरकारच्या कोणत्याही पावलाला आणि कृतीला विरोध करण्याचा विरोधी पक्षांना अधिकार आहे हे खरे आहे, पण किमान सहमतीच्या राजकारणाच्या शक्यता संसदेत तपासल्या पाहिजेत. राष्ट्रहितासाठी, ज्वलंत प्रश्नांवर आणि प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलन किंवा आक्रमकता असेल तरच फायदा होतो. लोकमान्य टिळकांनीही म्हटले आहे की - 'भेद विसरून सर्व पक्षांना एका विशिष्ट कार्यासाठी एकत्र आणणे हे जिवंत राष्ट्राचे लक्षण आहे.' राजकारणाच्या क्षेत्रात आज सर्वात चिंतेचा विषय म्हणजे विरोधी पक्षांचा सत्ताधारी पक्षाचा विरोध. संसदीय कामकाजात व्यत्यय आणणे आणि सत्ताधारी पक्षाला कमकुवत करण्यासाठी मोलहिल निर्माण करणे यासारख्या परिस्थितीमुळे देशाचे वातावरण प्रदूषित, विषारी आणि गोंधळलेले आहे. ज्वलंत प्रश्नांवर आणि समस्या सोडवण्यासाठी केले तरच फायदा होतो. लोकमान्य टिळकांनीही म्हटले आहे की - 'भेद विसरून सर्व पक्षांना एका विशिष्ट कार्यासाठी एकत्र आणणे हे जिवंत राष्ट्राचे लक्षण आहे.' राजकारणाच्या क्षेत्रात आज सर्वात चिंतेचा विषय म्हणजे विरोधी पक्षांचा सत्ताधारी पक्षाचा विरोध. संसदीय कामकाजात व्यत्यय आणणे आणि सत्ताधारी पक्षाला कमकुवत करण्यासाठी मोलहिल निर्माण करणे यासारख्या परिस्थितीमुळे देशाचे वातावरण प्रदूषित, विषारी आणि गोंधळलेले आहे. ज्वलंत प्रश्नांवर आणि समस्या सोडवण्यासाठी केले तरच फायदा होतो. लोकमान्य टिळकांनीही म्हटले आहे की - 'भेद विसरून सर्व पक्षांना एका विशिष्ट कार्यासाठी एकत्र आणणे हे जिवंत राष्ट्राचे लक्षण आहे.'

# शिक्षणाधिकारी मॅडम, मुलीला शाळेत पाठवायचे तरी कसे ?

## शौचालय घरोघरी, शाळेत विद्यार्थी शौचास उघड्यावरी, वाशी तालुक्यातील शाळेचे गंभीर वास्तव

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** मोदीजींनी महिला आरक्षण विधेयकासंदर्भात केलेली घोषणा ही नव्या संसद भवनात महिलांसाठी मोठी घोषणा केली खरी मात्र महाराष्ट्रातील बहुतांश ग्रामीण भागात अजूनही महिलेसाठी मूलभूत सुविधाच उपलब्ध नाही.

याच महाराष्ट्रातील विकासाबाबतीत कायम मागासलेल्या धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थिनीसाठी विसाव्या शतकातही शाळेत साधे शौचालय नसणे ही, "महाराष्ट्रातील गतिमान सरकारसाठीअतिशय लज्जास्पद बाब आहे."

महिन्या-दीड महिन्या पूर्वीच चांद्रयान-३ घेतलेली यशस्वी भरारी त्यानंतर आदित्य एल_१ याची सूर्याकडे झेप या इस्रोच्या यशस्वी कामगारी बाबत




विद्यार्थी-विद्यार्थिनीस शाळेत अध्ययन केले जाते. उद्याचे शास्त्रज्ञ घडविणारी हीच शाळा शिक्षण विभागाच्या बेशिस्त पणामुळे चव्हाट्यावर आली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे या विद्यार्थ्यांस उघड्यावर शौचालयास लावणाऱ्या शाळेच्या पाठ भिंतीला गटशिक्षण अधिकारी कार्यालय आहे. गावातील अतिशय मोक्याच्या ठिकाणी असणाऱ्या शाळेच्या परिसरामध्ये एकात्मिक बालविकास

> खोट्या आश्वासनांचे गाजर दाखवणाऱ्या नेत्यांसाठी याच शाळेमध्ये सार्वत्रिक निवडणूका होतात. यानंतर निवडून येणाऱ्या या लोकप्रतिनिधींकडून दिलेली आश्वासने तर सोडाच पण ज्या शाळेत ठेवलेल्या मतपेटीवर आपण निवडून आलो त्याच शाळेत शौचालय नाही हे जाणीवपूर्वक विसरतात की काय ही गोष्ट जिल्ह्यातील त्या उपेक्षित विद्यार्थी-विद्यार्थिनी व पालकांसाठी खूप मोठी खेदजनक बाब आहे. अशा शौचालय विना शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनी कडून जेव्हा शाळेतील शिक्षक वर्ग गावात प्रभात फेरी काढून स्वच्छ भारत मिशनचे नारे द्यायला लावणे कितपत योग्य आहे.

कार्यालय त्याच्या बाजूला मंडळ अधिकारी कार्यालय,तलाठी कार्यालय, चिमुकल्यांसाठी अंगणवाडी त्या अंगणवाडीला सुद्धा शौचालय नाही. याच शाळेच्या 100 मीटर परिघामध्ये वाशी नगरपंचायतचे चार कार्यशील म्हणणारे नगरसेवक आहेत. तसेच शौचालय विना भरवली जाणारी ही शाळा गावच्या पुढारी, स्वयंघोषित नेते, सामाजिक संघटना, शिक्षणाधिकारी, बी.डी.ओ त्यांच्यासाठी अतिशय शरमेची बाब आहे. कारण या शाळेमध्ये एकूण विद्यार्थी पट संख्या १०५आहे.त्यात विद्यार्थी संख्या ५४ त्यापैकी विद्यार्थिनी संख्या५१ आहेत. शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांनी शाळेत स्वच्छतेबाबत काय धडे घेऊन, समजात कसे वावरायचे हा मोठा प्रश्न आहे. शाळेतल्या सावित्रीच्या लेकीला तर मासिक पाळीच्या काळात किती यातना सोसाव्या लागत असतील हीगोष्ट महिला शिक्षणाधिकारी स्त्री समजायला हवी. याच शाळेला गेल्या आठवड्यात महिला जिल्हा न्यायाधीश यांचीही भेट झालेली आहे. शाळेतील उघड्यावरील शौचालय बाबतीत येणाऱ्या अडचणी मुली कोणासमोर मांडू शकत नाहीत. विशेष या शाळेमध्ये दोन महिला शिक्षिका सुद्धा आहेत त्यांच्यासाठीही शौचालय प्रश्न खूप गंभीर आहे. वाशी शहरातीलच शाळेचच चित्र एवढं भयानक असेल अन् त्यात गावातली नेत्यांना कार्यकर्त्यांकडून कार्यसम्राट, साखर सम्राट,विकासाचा महामेरू, एकच नेता, आमचे दैवत, ओन्ली... अशा पदव्या देणाऱ्या अंध कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांकडून काय अपेक्षा ठेवता? कारण जिथे तुमची लेकरं शिकतात त्याच शाळा शौचालय विना भरवल्या जातात.

आणि तुम्ही त्यांना दैवत मानता, त्या नेत्यांची लेकरं शहरात इंग्लिश माध्यमात शिकतात. ही बाब आता तरी समजून घ्यायला हवी, वाशी येथील गणेश मंडळ भक्तांनो येणाऱ्या गणेशोत्सव काळामध्ये आपल्या मंडळासाठी गोळा केली जाणारी वर्गणी एखाद्या देखव्यासाठी किंवा कर्ण कर्कश डीजेसाठी खर्च करण्यापेक्षा सावित्रीच्या लेकींच्या शौचालयासाठी खर्च करा. खरं तर हेच तुमचं एक गाव एक मंडळ राहील.



# छत्रपतींना आणि विश्वरत्नांना कधीच विसरु नका : वसंत हंकारे

## लेकरांनो बाप म्हणजे वाघ, आई म्हणजे वाघीण; निरेत व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** मला प्रबोधन नव्हे तर परिवर्तन हवे. छत्रपतींना आणि विश्वरत्नांना कधीच विसरु नका. एक वेळ सख्ख्या भावाचा फोटो तुमच्या जवळ नसला तरी चालेल पण छत्रपती शिवाजी महाराज आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो तुमच्या जवळ ठेवा.कारण हे दोन बाप जर या मातीत जन्माला आले नसते तर कुठली लेक ही रस्त्याने फिरू शकली नसती हे लक्षात घ्या. हे दोन बाप या मातीला मिळाले नसते तर आज कुठलीच लेक सुरक्षित राहिली नसती.

म्हणून या दोन बापांना कधीच विसरू नका, असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार, आनंदी जीवनाचे साधक व युवा व्याख्याते वसंत हंकारे यांनी केले. निरा, ता.पुरंदर येथील महात्मा गांधी विद्यालय व किलाचंद कनिष्ठ विद्यालय, लिलावती रिखवाल शहा कन्या विद्या मंदिर प्रांगणात जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांच्या संकल्पनेतून निरा शहर शिवसेनेच्या माध्यमातून श्री.कृष्ण जन्माष्ठमीचे औचित्य साधून निरा शहर शिवसेनेचे कार्यकर्ते पै. गणेशकाका गडदरे व तेजस्वीताई गडदरे यांच्या आयोजनाने निरा शहरातील शालेय, कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी तसेच निरा शहरातील तरुण तरुणींसाठी वैचारिक

> ये पोरींनो तू जिजाऊ, तू सावित्री आहेस... वसंत हंकारे यांनी फुसले मुलींच्या अश्रूंना... युवा व्याख्याते वसंत हंकारे यांचा एक अन एक शब्द हा प्रत्येकाच्या काळजात जाऊन बसत होता. आजच्या पिढीला आई आणि बाप समजुन सांगत असताना अंगावर काटा आणणारे अनेक प्रसंग त्यांनी मांडले.अगोदर सर्वांना खळखळून हसविले.
> पण नंतर अक्षरश: त्यांच्या शब्दाने अनेक मुलींसह शिक्षकवृंदच नव्हे तर उपस्थितांचे डोळे सुध्दा पाणावले.ये पोरीनों तू जिजाऊ आहेस, तू सावित्री आहेस असे सांगताना मुलींमध्ये एक नव ऊर्जा देण्याचे काम वसंत हंकारे यांनी केले.
> कार्यक्रम संपन्न होताच मुलींच्या गराड्यात जेव्हा वसंत हंकारे जातात तेव्हा अनेक मुलींच्या डोळ्यातील अश्रूंना त्यांनी फुसले.अन डोक्यावर मायेचा हात ठेवून धीर दिला.

प्रबोधन घडविण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी युवा व्याख्याते वसंत हंकारे यांनी विद्यार्थ्यांसमोर मोलाचे आणि महत्वपूर्ण असे मार्गदर्शन करणारे व्याख्यान दिले. कार्यक्रम प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले.

यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुनील अण्णा चव्हाण, महात्मा गांधी विद्यालयाचे प्राचार्य कोकरे सर, सौ. लिलावती रिखवाल शहा कन्या विद्या मंदिरच्या प्राचार्या नायकोडी मॅडम, श्री.स्वामी समर्थ दूध उत्पादक मंडळ संस्थापक अध्यक्ष गणेश गडदरे, संचालिका तेजस्वीताई गडदरे, शिवसेना महिला तालुकाप्रमुख वैशाली काळे, उषाताई पवार, सागर मोकाशे, विराज मदने, सचिन मोरे, अमोल साबळे, महेश जेधे, सुनील जाधव, मंगेश बिनताडे, मिलिंद इनामके, अवि बडदे, गोपाळ बंडगर,रणवीर खरात, संग्राम घोणे, निखिल बनसोडे,बंटी पवार, स्वप्नील जगताप, मंदार जगताप आदीं सह शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्याख्यानापूर्वी भीम सामाजिक विकास प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अमोल साबळे यांनी भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत आणि गोविंद पानसरे लिखित शिवाजी कोण होता? हे पुस्तक देऊन युवा व्याख्याते वसंत हंकारे यांचा सत्कार केला.

वसंत हंकारे पुढे म्हणाले की, आयुष्यभर बापाच्या जीवावर बसून खावं लागलं तरी चालेल पण आयुष्यात असं कुठलच काम करू नका लेकरांनो ज्याच्या मुळे तुमच्या आई बापाला मान खाली घालावी लागेल.तुझा बाप म्हणजे वाघ आहे.तुझी आई म्हणजे वाघिण आहे.हे अजिबात विसरू नका.वसंत हंकारे यांचे व्याख्यान ऐकल्यानंतर असे व्याख्यान मुलींसाठी व आजच्या तरुण पिढीसाठी पुन्हा पुन्हा झाली पाहिजेत.असा सूर येऊ लागला आहे. या आयोजना बद्दल गणेश गडदरे आणि तेजस्वीताई गडदरे यांचे विशेष कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विराज मदने, प्रास्ताविक व स्वागत गणेश गडदरे व आभार प्रदर्शन प्राचार्या नायकोडी मॅडम यांनी केले.

# मराठवाडा सरचिटणीसपदी गोकुळसिंग राजपूत, जिल्हा अध्यक्ष प्रदीप जगताप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्यासह भारतातील एकूण २१ राज्यात सतत वीस वर्षापेक्षा जास्त काळापासून सर्वसामान्यांच्या हक्कासाठी व स्वातंत्र सैनिकाच्या सन्मानासाठी कार्य करणाऱ्या आणि भ्रष्टाचार निर्मूलनासाठी लढा देणाऱ्या अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या मराठवाडा विभागीय सरचिटनीस पदी गोकुळसिंग राजपूत तर जिल्हा अध्यक्ष शिवव्याख्याते प्रदीप जगताप या पदांवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा लातूर संपन्न झालेल्या १३ व्या अधिवेशनात सन्मानपत्र व नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी या १३ व्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी प्रमुख पाहुणे माननीय खासदार सुधाकरजी शुरंगारे (खासदार लातूर) कार्यक्रमाचे विशेष अतिथी मा. संजीव जनरल पोलीस ऑफ पोलिस कमिशनर सीआरपीएफ, प्रमुख पाहुणे रवींद्र येळूनकर अध्यक्ष अखिल भारतीय स्वतंत्र सेनानी ( नवी दिल्ली ),राणीताई स्वामी, कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर राष्ट्रीय अध्यक्ष त्यांच्या उपस्थितीत देशातील व राज्यातील अनेक पदाधिकारी यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली व समितीचे ध्येय धोरण ठरविण्यात आले आणि गोकुळसिंग राजपूत व प्रदीप जगताप त्यांचे वर्षभरातील कार्य बघून राष्ट्रीय कमिटीने त्यांना तालुका अध्यक्ष पदावरून त्यांची बढती देत मराठवाडा विभागीय सरचिटनीस या पदावर नियुक्ती दिली तर पत्रकार तथा शिवव्याख्याते प्रदीप जगताप यांना जिल्हाध्यक्ष पदावर वरून छत्रपती संभाजी -पदावर नियुक्ती केली व त्यांना राष्ट्रीय सरदार वल्लभभाई पटेल हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी मान्यवरांनीही त्यांना शुभेच्छा देऊन सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी दादासाहेब काळे, अरुण चव्हाण देशमुख, सुनील उंबरकर कोसगांव,गजानन काळे खुपटा,संजय जटाळे जामनेर तालुका अध्यक्ष, तालुका उपाध्यक्ष कृष्णा पाटील तोरनाळा,सुनील चोरमारे तालुका सचिव सोयगाव, बाबासाहेब देशमुख रेणुका पिंपळगांव,अशा प्रकारे महाराष्ट्रभर व इतर राज्यातील बऱ्याच पदाधिकारी अधिकारी उपस्थित होते.



# आमदार बाळासाहेब आजबेंची शानदार कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**पाटोदा :** तालुक्याच्या विकासासाठी दमदार आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी कोट्यावधी रुपय मंजूर करून आणले. या मध्ये प्रामुख्याने पाटोदा तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालयाला स्वतःची जागा व इमारत नसल्याने अधिकारी व कर्मचारी यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता ही बाब आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या निदर्शनास येताच आमदार आजबे काका यांनी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या समोर हा प्रश्न उपस्थित केला. यामुळे मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दिवशीच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून प्रशासकीय इमारती साठी ३० कोटी रुपय मंजूर करून आणले. तालुक्यातील पाणी प्रश्न गंभीर असल्याने पाटोद्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागवा म्हणून पाटोदा तालुक्यातील उंबरविहीरा साठवण तलावासाठी १५ कोटी तर रोहतवाडी साठवण तलावासाठी १९ कोटी रुपय मंजूर केले.

# संस्कार आणि ज्ञान सोबत मिळणे आवश्यक : सुधीर मुनगंटीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 'शिक्षण, संस्कार आणि संस्कृती' हे महर्षी विद्या मंदीरचे ब्रिद वाक्य आहे. गुरुकूल शिक्षण मंडळाच्या या शाळेला कॉन्व्हेंट न म्हणता मंदीर म्हटले जाते आणि मंदिरात शिकणारे विद्यार्थी हे संस्कारी असतात. शिक्षण संस्कारी नसेल तर आपण फक्त साक्षर असू, मात्र सुसंस्कृत असणार नाही. त्यामुळे उत्तम व्यक्तिमत्वाचे धनी व्हायचे असेल तर संस्कार आणि शिक्षण सोबत मिळणे अतिशय आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

महर्षी विद्या मंदीर पोचमार्गावरील ब्रिज कम बंधाराच्या बांधकामाचे भुमिपूजन केल्यानंतर विद्यार्थ्यांचा सत्कार करतांना ते बोलत होते. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराव भोंगळे, भाजपा महानगराचे अध्यक्ष राहुल पावडे, माजी महागराचे अध्यक्ष डॉ. मंगेश गुलवाडे, सा.बां. कार्यकारी अभियंता सुनील कुंभे, गुरूकुल विद्या मंडळाचे अध्यक्ष गिरीश चांडक, सचिव दत्तात्रय कंचर्लावार, उपाध्यक्ष वसुधाताई कंचर्लावार, संस्थेचे सदस्य उमेश चांडक, अल्का ताई चांडक, वीरेंद्र जयस्वाल, प्राचार्य लक्ष्मीताई मूर्ती,उपअभियंता प्रकाश




अमरशेट्टीवार, दाताळाच्या सरपंच सुनिता देशकर, उपसरपंच विजयालक्ष्मी नायर आदी उपस्थित होते.

स्वतःसोबतच समाजासाठी आणि देशासाठी शिकणारे विद्यार्थी घडावे, अशी अपेक्षा व्यक्त करून पालकमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, महर्षी विद्या मंदीरच्या विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले छायाचित्र तसेच पुष्पगुच्छाने माझे स्वागत करण्यात आले, याचा मला अतिशय आनंद आहे. जीवनाच्या प्रत्येक लढाईत महर्षी विद्या मंदिरचे विद्यार्थी नक्कीच यशस्वी होतील. मात्र त्यासाठी परिश्रमाची गरज आहे. चंद्रपूर हा वाघांचा जिल्हा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनो, शिक्षणात वाघासारखाच पराक्रम करा. आपल्या भविष्यासाठी राबणाऱ्या आई-वडीलांचा नेहमी सन्मान करा. चांगले आणि संस्कारी विद्यार्थी घडले तरच समाज घडेल असेही पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले.



# लोह्यात धनगर समाजाचा एल्गार

## तहसीलवर धडकला मेंढ्यांसह विराट मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्रातील धनगर समाज बांधवांना अनुसूचित जमाती (एसटी)च्या आरक्षणाची अमंलबजावणी करावी व धनगर समाजाच्या वतीने चौंडी येथे बेमुदत सुरू केलेल्या उपोषणाच्या समर्थनार्थ लोहा येथे दि. १८ सप्टेंबर २०२३ रोजी शहरातील बिरोबा मंदिरापासून ते तहसील कार्यालयावर मेंढ्यासहित ढोलताशांच्या गजरात जोरदार घोषणाबाजी करीत प्रचंड एल्गार मोर्चा काढून लोहा तहसिलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद संभाजी महाराज धुळगुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव हाके, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रसेन पाटील, माणिकराव देवकते युवानेते धीरज भैय्या हाके, सरपंच किरण पाटील हाके, हनुमंत धुळगुंडे, मारोतराव जंगले, वैभवकुमार हाके, पिराजी धुळगंडे, माधव डोईफोडे, किसन गुंठे, दशरथ गुंठे, गजानन कराडे, नवनाथ पोले, प्रसाद पोले, मारोती श्रीरामे, दशरथ मणाडे, विठ्ठल हाबगुंडे, मुन्ना नाईक यांच्यासह मोठ्या संख्येने लोहा तालुक्यातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ओएनजीसी प्रकल्पबाधित शेतकरी व पारंपारिक मच्छिमार भरपाईपासून वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** 08 सप्टेंबररोजी सकाळी ओ.एन.जी.सी. प्रकल्प उरण येथून मोठ्या प्रमाणात तेल गळती झाली होती. सदर तेल गळतीमुळे नागांव, केगाव, दांडा, खारखंड व करंजा या गावाजवळील क्षेत्रात मच्छिमार व शेतकरी यांचे आर्थिक नुकसान झाले होते. सदर नुकसानीची आर्थिक मदत मिळणे व ओ.एन.जी.सी. प्रकल्प मधून होणा-या तेल गळती बाबत उपाययोजना करणेकामी आढावा बैठक घेण्याची व नुकसान भरपाईची मागणी ग्रामस्थ नागाव, केगाव, दांडा, खारखंड व करंजा या गावातील ग्रामस्थांनी तहसील कार्यालयाकडे केली होती. त्यामुळे ओ.एन.जी.सी. प्रकल्पामधून होणाऱ्या तसेच गळती, नुकसान भरपाई व विविध मुद्दयाबाबत चर्चा व उपाययोजना करणेबाबत तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, उरण उद्धव कदम यांचे अध्यक्षतेखाली दि. 18/9/2023 रोजी दुपारी 12:30 वाजता आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत शेतकरी व प्रकल्पग्रस्त प्रतिनिधी, ग्रामस्थ उपस्थित होते. या बैठकीत प्रकल्पग्रस्त व शेतकऱ्यांनी आपली व्यथा, समस्या तहसीलदार उद्धव कदम यांच्याकडे मांडली व नुकसान भरपाई त्वरित देण्याची मागणी केली. या बैठकीत तहसीलदार उद्धव कदम यांनी शेतकरी व प्रकल्पग्रस्तांची बाजू ऐकून आम्ही तुम्हाला न्याय मिळवून देऊ असे सांगितले. मात्र नुकसान भरपाई संदर्भात ठोस असे आश्वासन व कार्यवाही होत नसल्याने शेतकरी संतापले व त्यांनी सुरु केलेली साखळी उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्णय घेतला. यावेळी सुरवातीपासून शेतकरी व प्रकल्पग्रस्तांची बाजू घेउन शेतकरी व प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत असलेले वैभव कडू यांनी शेतकरी व प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा यासाठी वेळोवेळी आवाज उठविला. शासनाच्या प्रत्येक विभागात पत्रव्यवहार केला. मात्र नुकसान भरपाई मिळाली नाही. तहसील कार्यालयात सुद्धा मिटिंग झाली. त्यातही नुकसान भरपाई संदर्भात योग्य ते निर्णय झाले नाही. आणि जे निर्णय झाले ते प्रकल्पग्रस्त, शेतकऱ्यांना मान्य नाहीत. त्यामुळे ओएनजीसी बाधित शेतकरी, प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळाला नाही तर ओएनजीसी प्रशासनाविरोधात आमरण उपोषण करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते वैभव कडू यांनी ओएनजीसी प्रशासनाला दिला आहे.

दिनांक 8 सप्टेंबर रोजी पहाटे 3 वाजल्यापासून उरण तालुक्यातील पिरवाड समुद्र किनारी असलेल्या ओएनजीसी कंपनीतून मोठ्या प्रमाणात क्रूड ऑईल सोडण्यात आले. या केमिकल युक्त तेलाने कंपनीच्या आजूबाजूच्या परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली होती शिवाय हे तेल गळती नाल्यावाटे शेतात व समुद्रात पसरले त्यामूळे प्रचंड प्रमाणात शेतक-यांचे व मच्छीमार बांधवाचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना समजताच नागाव येथील सामाजिक कार्यकर्ते वैभव कडू यांनी घटना स्थळाची पाहणी केली. उरणचे तहसिलदार उद्धव कदम, मंडळ अधिकारी अनिल पाटील,पोलीस अधिकारी एपीआय होलगे,ओएनसीसी प्रशासनाचे ऑपरेशन हेड एस.के. त्रिवेदी, जनरल मॅनेजर आर के सिन्हा यांनी घटनेची पाहणी केली. या पाहणी दरम्यान घटना स्थळी मांगीण देवी मंदिरात महत्वाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत कंपनीच्या आजूबाजूच्या परिसरातील शेतकरी, मच्छीमार व ग्रामस्थांनी आपली व्यथा त्यांच्या समोर मांडली. तहसीलदार उद्धव कदम यांनी तहसील कार्यालय, ओएनजीसी प्रशासन व बाधित प्रकल्पग्रस्त ग्रामस्थ, शेतकरी यांची संयुक्त बैठक लावण्याचे आश्वासन दिले होते.

# खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांच्या विकास-उन्नतीसाठी 'अमृत' ठरेल नवसंजीवनी!

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** खुल्या प्रवर्गातील ज्या जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था अथवा महामंडळांच्या योजनांचा लाभ मिळत नाही, अशा खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध योजना, उपक्रम, कार्यक्रम, तसेच इतर माध्यमांतून विकास व आर्थिक उन्नती घडविण्यासाठी राज्य सरकारने 'अमृत' अर्थात महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधनी या स्वायत्त संस्थेची स्थापना केली आहे. 'अमृत'चे मुख्यालय पुणे येथे असून, विविध योजनांच्या माध्यमातून राज्यात या नव्या संस्थेचे कामदेखील सुरू झालेले आहे.

खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवती व इतर उमेदवारांसाठी विविध उपक्रम, कार्यक्रम, योजना राबवून त्यांच्यात विकास व आर्थिक उन्नती घडावी, यासाठी राज्य सरकारने 'अमृत'ची स्थापना केली आहे. ही एक स्वायत्त संस्था आहे. राज्य सरकारच्या यापूर्वी अस्तित्वात असलेल्या व त्या त्या समाजघटकांसाठी काम करणाऱ्या 'बार्टी', 'सारथी' व 'महाज्योती' या स्वायत्त संस्थांप्रमाणेच 'अमृत' चे देखील कामकाज नव्याने सुरू झालेले आहे. ज्या खुल्या प्रवर्गातील जातींना कुठल्याही स्वतंत्र शासकीय विभाग, संस्था अथवा महामंडळांचा लाभ मिळत नाही, अशा जातींतील आर्थिक दुर्बल घटकांना 'अमृत' मार्फत उद्योग-विकास, प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, नोकरी यासह विविध कार्यक्रम व उपक्रमांचा लाभ देण्यासाठी विविध योजनांची आखणी करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने, खुल्या प्रवर्गातील परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील जे उमेदवार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) पूर्वपरीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांना मुख्य परीक्षेसाठी; तसेच जे उमेदवार मुख्य परीक्षाही उत्तीर्ण होतील, त्यांना मुलाखतीच्या तयारीसाठी अर्थसहाय्य दिले जाणार आहे. तसेच, याच घटकांतील जे उमेदवार संघ लोकसेवा आयोगाची (यूपीएससी) नागरी सेवा पूर्वपरीक्षा उत्तीर्ण होतील, त्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी, तसेच मुख्य परीक्षाही उत्तीर्ण होतील, त्यांना मुलाखतीसाठी अर्थसहाय्य दिले जाणार आहे.

खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थी, युवक-युवती यांच्यात COMPANY SPECIFIC तसेच सर्वसामान्य आवश्यक ते कौशल्यविकास घडवून काढण्यासाठी प्रशिक्षण देणे व त्यांना रोजगार, नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय साधणे, यासाठी कौशल्य विकासाच्या आधारे खाजगी कंपन्यांमध्ये नोकरी उपलब्ध करून देणारी योजनादेखील आहे. विविध प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे व विविध आस्थापना, उद्योगांशी संपर्क साधून नोकरी, रोजगाराच्या संधी नोंदणीकृत लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी समन्वयकाची भूमिका बजावणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. याशिवाय, खुल्या प्रवर्गातील परंतु आर्थिक दुर्बल घटकातील या उमेदवारांना व्यावसायिक उद्योजक घडविण्यासाठी 'ऑफलाईन आणि ऑनलाईन सर्वंकष प्रशिक्षण' देणे, व्यावसायिक शिक्षणाकरिता इंटर्नशीप उपलब्ध करून देणे, बँकांशी समन्वय साधून कर्जे उपलब्ध करून देण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य करणे, तसेच सातत्याने मागोवा घेऊन समन्वयातून अडचणींचे निरसन करून, व्यवसायवृद्धीबाबत मार्गदर्शन करणे, या संदर्भात आर्थिक विकासाकरिता प्रोत्साहन व प्रशिक्षण कार्यक्रम राबवून स्वावलंबी बनविणारी योजनादेखील आहे.

# गुरुवार पेठेत साकारले काळूबाई मंदिर

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन आज मोठ्या उत्साहात झाले. गणेशोत्सव म्हटले की देखावे आले. हलत्या, जिवंत देखाव्यांची उज्ज्वल परंपरा पुण्याच्या गणेशोत्सवाला असते. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसोबत पुणेकर गणेशभक्त घरातदेखील मोठ्या हौसेने देखावे उभारतात. गुरुवार पेठेतील पंचमुखी मारुती मंदिर येथे राहणाऱ्या किरण दीपक चव्हाण यांच्या घरी मांढरदेवी काळूबाई मंदिराची हुबेहूब प्रतिकृती साकारण्यात आली आहे.

किरण दीपक चव्हाण, कुणाल दीपक गादेकर आणि विक्रांत अरविंद खाडे यांनी हा देखावा साकार केला आहे. शौर्य किरण चव्हाण या लहानग्याच्या कल्पनेतून हा देखावा साकारला आहे. याआधीही किरण चव्हाण यांनी शंकर महाराज मठ, जागरण गोंधळ, सावरखेड एक गाव असे देखावे साकारले आहेत.

या देखाव्यासाठी तीनही मित्रांनी रात्रंदिवस मेहनत घेतली आहे. पुठ्ठा, काड्या, रंग, कागद आदी गोष्टींचा यामध्ये वापर करण्यात आला असून, पर्यावरणपूरक हा देखावा लक्ष वेधून घेत आहे.

हा देखावा साकारताना अगदी बारीकसारीक गोष्टींवर लक्षपूर्वक काम केले आहे. देवस्थानाची कमान, डोंगर, मंदिर परिसर, गाभारा, दुकाने, तुळशी वृंदावन, सूचनाफलक अशा सर्व गोष्टी खूप छान पद्धतीने बनवल्या आहेत. देवीची मूर्ती चांदीपासून बनवली असून, गाभारा सिल्व्हर फॉईल पेपर वापरून केला आहे. त्याला चांदीयुक्त गाभाऱ्याचे रूप प्राप्त झाले आहे. किरण चव्हाण म्हणाले, "गेल्या अनेक वर्षांपासून आवड म्हणून देखावे बनवत आहोत. यंदा मांढरदेवी काळूबाईचा देखावा बनवण्याची संकल्पना शौर्यने मांडली. आम्ही तिघेही प्रत्यक्ष मांढरदेवीला जाऊन पाहणी करून आलो. त्यानंतर एक आराखडा तयार करून त्यानुसार काम सुरु केले. १५ ऑगस्ट पासून यावर काम सुरु होते. सगळ्या गोष्टी अचूक करता आल्या, याचे समाधान आहे. साधारण आठ बाय दहा फूट एवढ्या जागेत हा देखावा आहे. मंदिर परिसरातील प्रत्येक गोष्ट बारकाईने टिपण्याचा आणि ती सादर करण्याचा प्रयत्न केला आहे."

विक्रांत खाडे म्हणाले, "प्रचंड मेहनतीने हा देखावा साकार केला आहे. देवीची मूर्ती चांदीची असून, देखाव्यातील महत्वाच्या वस्तू गणेशोत्सव झाल्यानंतर देवस्थानाला देणगी स्वरूपात देण्यात येणार आहेत. अधिकाधिक गणेशभक्तांनी हा देखावा पाहण्यासाठी ९३ गुरुवार पेठ, पंचमुखी मारुती मंदिर, पुणे येथे भेट द्यावी, असे आवाहन करतो."



# ठाणे येथे मॅको बँकेची शाखा लवकरच स्व-मालकीच्या जागेत

आधुनिक केसरी न्यूज

**ठाणे :** शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये अतिशय लोकप्रिय बँक म्हणून प्रसिद्ध असलेली मंत्रालय अँड अलाईड ऑफिसेस को-ऑप (मॅको) बँकेची ठाणे शाखा लवकरच स्वतःच्या जागेत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयालगत स्थलांतरीत होणार आहे.

आज या जागेची खरेदी नोंदणी सहनिबंधक कार्यालय, ठाणे येथे करण्यात आली. ही बँक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागील बाजूस, कंपाउंड लगत, श्यामकमल को.ऑप. हाऊसिंग सो.लि., ऑफिस क्र.3 व 4, पहिला मजला, कडवा लेन, साईबाबा मंदिर जवळ, ठाणे(प.) 400601 येथे लवकरच सुरू होत आहे.

आज या जागेच्या खरेदी नोंदणीसाठी बँकेचे अध्यक्ष प्रमोद पंडित, उपाध्यक्ष सुनील खाडे, संचालिका श्रीमती मंगल नाखवा, तसेच कर्मचारी प्रतिनिधी (संचालक) समीर तुळसकर, भगवान पाटील, कर्मचारी सहदेव बने हे उपस्थित होते. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर या सर्वांनी बँक कार्यरत होण्याच्या दृष्टीने सुरू असलेल्या कामाची पाहणी केली.

ही बँक सुरू झाल्यानंतर ठाणे जिल्ह्यातील शासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांसाठी अतिशय उत्तम बँकिंग सेवा-सुविधांचा लाभ मिळू शकेल तसेच स्टॅम्प पेपर, फ्रँकिंग सुविधा देखील सुरू करणार असल्याचे बँकेचे विद्यमान अध्यक्ष प्रमोद पंडित व उपाध्यक्ष सुनील खाडे यांनी सांगितले. याबरोबरच अहमदनगर, नाशिक, पालघर आणि पुणे येथेही मंत्रालय बँकेच्या शाखा या महिनाभरातच सुरू होत आहेत.

# पीआय प्रमोद पाटील यांच्या हस्ते आरती

आधुनिक केसरी न्यूज



**फागणे :** येथील नवयुग मित्र मंडळाच्या वतीने यंदा सात फुट उंची असलेल्या गणरायाची मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे जम्मू आणि काश्मीर राज्यातील पवित्र तीर्थस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या अमरनाथ यात्रेचा सुंदर देखावा साकारण्यात आला आहे. या आरास देखाव्याचे उद्घाटन तालुका पोलीस ठाण्याचे पीआय प्रमोद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

नवयुवक मित्र मंडळाच्या वतीने गेल्या 45 वर्षापासून बाप्पाची प्रतिष्ठापना करून अखंड परंपरा जोपासली जात आहे.तर अनेक सामाजिक धार्मिक उपक्रमही राबवले जात आहेत. नवयुवक मित्र मंडळाच्या वतीने ऐतिहासिक देखाव्यांसह यंदा समाज प्रबोधन करणारे आणि विविध ज्वलंत विषयांवर प्रकाश टाकणारे वैविध्यपूर्ण देखावे साकारण्यात आले आहेत.

पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून ओळखला जाणाऱ्या अमर यात्रेचा देखावा साकारून भाविकांचे लक्ष वेधले जात आहे. तर या सुंदर व आकर्षक देखाव्याचे उद्घाटन तालुका पोलीस ठाण्याचे पीआय प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले आहे. त्यानंतर त्यांना गणरायाच्या आरतीचा मान देऊन त्यांचा सत्कार ही करण्यात आला. या सुंदर देखाव्याचे पीआय प्रमोद पाटील यांनी कौतुकही केल आहे. तसेच गणेशोत्सवानिमित्त शांतता अबाधित राहावी व गुण्यागोविंदाने गणेश उत्सव साजरा करावा असे आवाहनही त्यांनी केले आहे. मंडळाने भव्यदिव्य देखाव्याची परंपरा यावर्षीही कायम ठेवली आहे मंडळाने यंदा साकारलेल्या देखावा पाहण्यास पहिल्याच दिवशी अलोट गर्दी झाली. अशाच पद्धतीने धार्मिक व सामाजिक उपक्रम मंडळाच्या वतीने राबवले जातील अशी माहिती ही यावेळी देण्यात आली आहे.

# धनगर आरक्षणासाठी खंबाटकी घाटात रास्ता रोको

## धनगर समाजाकडून आक्रमकपणे घोषणाबाजी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** "आरक्षण आमच्या हक्काचं,नाही कुणाच्या बापाचं." कोण म्हणतय देत नाही, घेतल्याशिवाय राहत नाही. अशा आक्रमकपणे घोषणा देत सातारा जिल्ह्यातील खंडाळा येथे खंडाळ्याचा खांबाटकी घाट रोखत सकल धनगर समाजाच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात आले. धनगर समाजास अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातील आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी. या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. राज्यभर धनगर समाज बांधवांकडून आंदोलन केले जात असून खंडाळा तालुक्यातील सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने सुद्धा आंदोलन पुकारण्यात आले. तसेच चौंडी येथे जे धनगर समाज बांधव हे आमरण उपोषणास बसलेले आहेत. त्यांच्या उपोषणास सुद्धा खंडाळा तालुक्यातील सकल धनगर समाजाने आंदोलनाच्या माध्यमातून पाठींबा दिला. आंदोलनापूर्वी खंडाळा येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो अशा घोषणा देण्यात आले. तदनंतर खंडाळा शहरातून मोर्चा हा पुणे

बंगळूर या राष्ट्रीय महामार्गाच्या दिशेने गेला.धनगर समाज बांधवांनी आंदोलनातून मेंढरं, घोडी घेत गजी नृत्य सादर करत, वाजत गाजत, घोषणा देत,



हाती पिवळे झेंडे घेऊन, भंडारा उधळीत एक भव्य दिव्य मोर्चाचे रूप घेऊन रास्ता रोको आंदोलन केले. राष्ट्रीय महामार्गावर मोर्चा जाताच दोन्ही बाजूचा रस्ता अडवून घोषणा बाजी करण्यात आली. धनगर समाजातील नेते मंडळी, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील लोकं सकल धनगर समाज बांधव व इतर समाज बांधवांसह विविध राजकीय पक्षातील लोकांनी आंदोलनात उपस्थित राहून पाठींबा दर्शविला. यावेळी अनेकांनी आपली मनोगते व्यक्त करत आरक्षणा बाबत भूमिका मांडल्या.तसेच खंडाळा सह विविध भागातून लोकं आली होती. आंदोलनाने दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. यावेळी पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# ढगाळ वातावरण निवळले, उकाडा वाढला

## विजेच्या लंपडावाने नागरिक त्रस्त; संबंधितांचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** ढगाळ वातावरण निवळल्याने उष्णतेच्या उकाळ्यात वाढ झाली आहे. त्यात वीजेचा लंपडाव सुरू झाल्याने डासाचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. आधिच वातावरणाचा बदल आरोग्यावर परिणाम करीत असून साथीचे आजार वाढल्याने शासकीय व खाजगी रूग्णालय रूग्णांनी हाऊसफुल झाल्याने डॉक्टरांना सुगीचे दिवस आले आहे.

हवामान बदलाचा मानवी आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम लक्षात घेता डॉक्टर सकस व पौस्टीक आहारावर लक्ष केंद्रीत करण्याचा सल्ला देत आहेत. कधी पाऊस तर कधी ढगाळ वातावरण तर कधी सुर्यप्रकाश अशा वातावरणामुळे विषाणूजन्य आजारात वाढ होत आहे. सप्टेंबर महिन्याचा पंधरवाडा उलटला असला तरी वातावरण विषारी व वीजेच्या लंपडावाने नागरिक त्रस्त असल्याने ताप, सर्दी, खोकला, सांदेदुखीने,डोकेदुखी यासारखे अनेक आजाराने नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यात विजेचा लंपडाव सुरू झाल्याने डासांसोबत माशाचाही त्रास वाढला आहे. डासाच्या उपद्रवाने रात्रीला नागरिकांची झोपमोड होत आहे. शहरातील अनेक वार्डात सांडपाण्याच्या नाल्या घाणीने तुंबले असून घाणपाण्यात डासाची उत्पत्ती मोठ्या प्रमाणात होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शासन प्रशासनाने याची दक्षता घेऊन तुंबलेल्या नाल्यातून घाणीची स्वच्छता करावी व विजेच्या लंपडाव थांबविण्यात यावा, अशी मागणी येथील विद्युत ग्राहकांनी केली आहे.



# श्री गणेशाचे घरोघरी थाटामाटात आगमन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** गणपती बाप्पा मोरया...च्या गजरात आज शहरासह गावागावात, घराघरात श्री गणेशाचे स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. सार्वजनिक गणेश मंडळांकडून, बालगणेश मंडळ, घरगुती श्रींच्या मुर्तीची आज स्थापना अतिशय जल्लोष व भक्तीमय वातावरणातकरण्यात आली.

लहान मोठ्या घरगुतीसह सार्वजनिक गणेश मंडळांच्या मुर्ती, पुजेचे व विविध साहित्य घेण्यासाठी बाजारपेठांमध्ये लोहा शहरात मोठी गर्दी झाली होती. गणेश भक्त गणपती बाप्पाची आतुरतेने वाट पाहत होते. लोह्यातील हळदव येथील श्री साईसह शहरातील विविध ठिकाणी मुख्य रस्त्याच्या आजूबाजूला विक्रेत्यांकडून श्री गणेश गणरायांची मूर्ती घेण्यासाठी गणपती बाप्पाला आपल्या घरी नेण्यासाठी अतिशय उत्साहात ढोल ताशाच्या गजरात गणपती बाप्पाचे जयघोष करीत टेम्पो, ट्रॅक्टर लहान मोठ्या चारचाकी वाहनांतून श्रीगणेशांचे भक्त गणपती बाप्पाला आपल्या गावी नियोजित स्थळी घरी घेऊन जात होते.

जय महाराष्ट्र गणेश मंडळ चव्हाण गल्ली येथील गणेश भक्तांनी माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्याहस्ते जुना लोहा येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्ण कृती पुतळ्याला पुष्पहार घालून वंदन करून पांढरे शुभ्र वस्त्र भगवे फेटे बांधून नगरपरिषद कार्यालय ते जुना लोहा अशी भव्य वाजत गाजत ढोल ताशांच्या गजरात, रॅली मिरवणूक काढून श्री गणेशाची आगमन झाले .माजी आमदार रोहिदास चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली माजी पं .स .बापूसाहेब रोहिदास चव्हाण, नगरसेवक संभाजी यशवंतराव चव्हाण, नगरसेवक जीवन रामराव चव्हाण यांच्या कडून जय महाराष्ट्र गणेश मंडळ, चव्हाण गल्ली जुना लोहा गणेश मंडळाचे सर्व चित्रीकरण शहरातील भाजी मंडई समोर करण्यात आले .



# सैन्यदलात भरती झालेल्या युवकांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** भोकरदन तालुक्यातील जवखेडा खुर्द येथील तरुण करण बाबासाहेब दानवे आणि मंगेश सुधाकर दानवे या दोन युवकांची भारतीय सैन्यदलात निवड झाली आहे. त्यानिमित्ताने राजूर येथे औक्षण करून पेढा भरवत निवड झालेल्या युवकांचा त्यांच्या पालकांसह शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

एप्रिल-2023 मध्ये सैन्यदलातील जागांसाठी लेखी परीक्षा झाली होती तर शारीरिक चाचणी जून-2023मध्ये घेण्यात आली होती. नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून त्यामध्ये करण बाबासाहेब दानवे व मंगेश सुधाकर दानवे यांची भारतीय सैन्यदलात निवड झाली आहे.जवखेडा खुर्द येथील युवकांची देशसेवेसाठी निवड झाली त्याबद्दल राजूर येथे गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर सुधाकरराव दानवे व त्यांच्या सुविद्य पत्नी योगिताताई दानवे यांच्या हस्ते सैन्यदलात भरती झालेल्या युवकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी भगवानराव नागवे, पंडितराव पुंगळे, डॉ. दीपक गाढवे,प्रा.बाळासाहेब बोराडे, सुधाकर दानवे, बाबासाहेब दानवे, बालू दानवे, अशोक हळदे आदी जणांनी सैन्यात भरती झालेल्या युवकांचे अभिनंदन केले.

# लोह्यात असभ्य वर्तन करणाऱ्या चौघांवर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** पोलीस स्टेशनमध्ये शर्टाच्या गुंड्या मोकळ्या सोडून फिरणाऱ्या 4 जणावर मुंबई पोलीस अधिनियम 110/117 प्रमाणे चार केसेस दाखल करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी कोणत्या प्रकारे वर्तन करावे याबाबत मुंबई पोलीस अधिनियम 1951 मध्ये सांगितले आहे.पोलीस स्टेशन हे एक सार्वजनिक आणि शिस्तीचे ठिकाण असल्याचे पो.नि.चिंचोलीकर म्हणाले. पोलीस स्टेशन मध्येच आपल्या शर्टाच्या गुंड्या मोकळ्या ठेवून असभ्य वर्तन करणाऱ्या लोकांवर काल दि.(१८) सप्टेंबर रोजी लोहा पोलीसांकडून कारवाई करण्यात आली.

लोहा पोलीस स्टेशन येथे विविध कामानिमित्ताने किंवा बोलावल्या म्हणून आलेल्या चार लोकांनी त्यांच्या शर्टाच्या गुंड्या मोकळ्या ठेवून पोलीस स्टेशनला कोणत्याही कामानिमित्त जरी गेले असाल तरी आपले वर्तन हे सभ्य असावे,आपली बोलीभाषा, आपला आवाज हा कमी असावा अन्यथा 110/112/117 प्रमाणे कारवाई होऊ शकते असेही पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोलकर यांच्याकडून सांगण्यात आले.

# मराठा समाजाला आरक्षण द्या या मागणीसाठी लाक्षणिक उपोषण

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्यात यावे या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवेली जरोटी येथील मनोज पाटील जरांगे हे आमरण उपोषणास बसले होते. या उपोषणास पाठिंबा म्हणून आज टेळकी येथे समस्त गावकऱ्यांच्या वतीने एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करून मराठा समाजाला आरक्षण द्यावे अशी मागणी करण्यात आली. टेळकीचे सरपंच प्र. संदीप हिरामणराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लाक्षणिक उपोषण करण्यात आले यावेळी सरपंच संदीप देशमुख तंटामुक्त समितीचे अध्यक्ष भारत हंबर्डे सुनील मोरे सदाशिव मोरे सुरेश मोरे बापूराव मोरे गोविंदराव मोरे शंकरराव मोरे राजेश मोरे राम मोरे विठ्ठल हंबर्डे साहेबराव मोरे रमण मोरे गुलाबराव मोरे दत्तराव मोरे चंद्रकांत मोरे अंकुश मोरे चंपतराव मोरे गोविंद कदम धोंडीबा मोरे पोलीस पाटील शंकर कांबळे गोविंद कानगुले यांच्यासह मोठ्या संख्येने गावकऱ्यांनी लाक्षणिक उपोषणास सहभाग घेतला यावेळी सोनखेड पोलीस ठाण्याचे जमादार एम पी फड यांनी बंदोबस्त ठेवला होता शांतेत लाक्षणिक पोषण संपन्न झाले.




# जिल्हा राष्ट्रवादी महिला कॉँग्रेसची अभिनव स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे आराध्य दैवत श्री गणरायाचे मोठ्या उत्साहात वाजत गाजत सर्वत्र आपल्या लाडक्या बाप्पाची स्थापना केली आहे. हाच उत्साह आंनद द्विगुणित करण्यासाठी राष्ट्रवादिच्या जिल्हा महिला अध्यक्ष स्वातीताई कोल्हे यांच्या संकल्पनेतून महिलांसाठी अभिनव असे गौरी गणपती सजावटीचे जिल्हा व तालुका स्तरीय 'सेल्फी विथ गौरी गणपती' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक असे बक्षीसे देण्यात येणार आहे. स्पर्धेचे नियम व अटी पुढील प्रमाणे - गौरी गणपती सजावटीचा तीन मिनिटांचा व्हिडिओ स्पर्धक महिलांनी दिलेल्या संबंधित मोबाईल क्रमांकावर पाठवायचा आहे. तीन मिनिटांपेक्षा अधिकचा व्हिडिओ स्पर्धेतून बाद करण्यात येईल. २४ सप्टेंबर च्या रात्री १२ वाजेपर्यंत चे व्हिडिओ ग्राह्य धरण्यात येईल. व्हिडिओ पाठविताना सोबत संपूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, जी. पी. आर. एस.सह गौरी गणपतीच्या सजावटीसह सेल्फी पाठवणे बंधनकारक आहे. या स्पर्धेसाठी मोबाईलवरच व्हिडिओ सोबत सेल्फी आणि पत्ता 9325545159 या मोबाईल क्रमांकावर पाठवावेत.

# दिव्यांगाच्या दारी शासन कार्यक्रमापूर्वी मागण्या पूर्ण करा

## समीर पटेल : दिव्यांग विकास संघर्ष समितीचे जिल्हा प्रशासनाला निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**सिद्धार्थ वाठोरे**

**हदगाव :** दिव्यांगाच्या दारी शासन अभियानापूर्वी दिव्यांगाच्या विविध प्रलंबित मागण्या आहेत. त्या दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी अभियानपूर्वी मागण्या पूर्ण करण्यात यावे. याकरीता दिव्यांग विकास संघर्ष समितीचे अध्यक्ष समीर पटेल यांनी स्थानिक व जिल्हा प्रशासनाला निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे दिव्यांगाच्या दारी शासन अभियानात होणारा खर्च हा पाच टक्के दिव्यांग निधीतून करण्यात येऊ नये. दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी अभियानात जिल्ह्यातील प्रत्येक दिव्यांगाचे सर्वेक्षण दिव्यांगाच्या घरी जाऊन करून, दिव्यांगाची सर्व माहिती गुगल शिटवर ऑनलाईन प्रणालीवर नोंदणी करावी. दिव्यांगाला दिव्यांग विभाग दिव्यांगाच्या दारी कार्यक्रमात सहभागी साठी दिव्यांगाला त्यांना गावातून नेणे आणणे, दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी अभियानात दिव्यांगाची कसल्याही प्रकारे हेडसाळ होणार नाही. यांची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. दिव्यांगाला महाराष्ट्र राज्य परिवहन एस.टी. बसचा प्रवास मोफत देण्यात यावा. दिव्यांग व्यक्तीला शासन निर्णय दि. २१ डिसेंबर २०२० रोजी नुसार दिव्यांगाला अंत्योदय योजनेत त्वरित लाभ द्यावा. दिव्यांगाला ग्राम पंचायत, नगर पंचायत, नगर परिषद आणि महा नगर पालिकेतील पाच टक्के दिव्यांग निधी तात्काळ देण्यात यावा. शासकीय व निम शासकीय कार्यालयात व कार्यालयीन परिसरात दिव्यांगाला स्वयंरोजगार करिता २०० स्क्वेअर फुट जागा आणि ग्राम पंचायत, नगर पंचायत, नगर परिषद, महा नगर पालिका हद्दीतील बांधकाम गाळयात दिव्यांगाला व्यवसाय करिता गाळे देण्यात यावे. संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांगाचे मासिक अनुदान पंधराशे रुपये प्रमाणे दर महिन्याला पहिल्या आठवड्यात देण्यात यावे. व तसेच संजय गांधी निराधार योजनेची बैठक झाल्यास त्या दिवशी पात्र व अपात्र याद्या लावावे. दिव्यांगाचे प्रत्येक कार्यालयातील व विभागातील प्रलंबित कामे तत्काळ पूर्ण करावे.




हे वरील विविध दिव्यांगाच्या मागण्या आहेत. ते दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी अभियान पुर्वी तात्काळ मान्य करावी. ज्यांनी करून दिव्यांगाला खऱ्या योजनेचा लाभ मिळेल. अशी मागणी दिव्यांग विकास संघर्ष समितीचे अध्यक्ष समीर पटेल यांनी केले आहेत. त्यांच्या सोबत जमीर पटेल, अजिंक्य अशोक चव्हाण, फारुक कुरेशी, शेख अहमद भाई, कुबेर राठोड, शेख इमरान, दिपक सुर्यवंशी, शेख सलीम, रमेश गोडबोले, शेख सजित, गजानन शिंगणे, सुलताना कुरेशी, धुरपत सूर्यवंशी, मारुती लांडगे, गजानन पऊळ आदीसह यावेळी उपस्थित होते.

# चिंचोली (लिं ) येथे माता - बालसंगोपन शिबिर; प्राचार्य डॉ. टकले, डॉ. बनकर यांचे मार्गदर्शन



आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली लिंबाजी :** दि.20 सप्टेंबर 2023 रोजी गृहविज्ञान विभाग, कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली(लिं.) व प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली(लिं.) यांच्या संयुक्त विद्यमाने ' माता बालसंगोपान कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटक धारेश्वर शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष श्रीमती वत्सलाताई सपकाळ पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनकर टकले यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना पूर्वीची जीवनशैली आणि आधुनिक जीवनशैली यातील फरक समजावून सांगत महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्याची अत्यंत आवश्यकता असल्याचे सांगितले .डॉ वंदना बनकर यांनी गर्भवती महिला व बालकुपोषण या विषयावर बोलताना आहार-आरोग्य याचा सबंध ,कुपोषणाची कारणे समतोल आहार ईत्यादींचे महत्त्व सांगून ,आजच्या बालकांच्या आरोग्यावर देशाचे भवितव्य अवलंबून असते म्हणून बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी गरोदर तसेच स्तनदा माता यांनी स्वतः आपल्या आरोग्याची काळजी घेऊन बालक कुपोषणमुक्त जन्माला येवून ते तंदुरुस्त कसे राहील याकडे लक्ष द्यावे.याबरोबरच किशोरवयीन मुलींनिही आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे कारण त्या भावी माता आहेत.यासाठी सर्वांनी समतोल आहाराकडे लक्ष दिल्यास मानवी आरोग्य चांगले राहील.

प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत अभंग यांनीही गर्भवती महिलांसाठी लसीकरण व वेळोवळी असणाऱ्या तपासण्यांचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी डॉ.सय्यद अमेर, संजय साळवे सर, एस. आर.सुकडे मँडम, पंडित सपकाळ, भिकन मोरे प्रयोगशाळा सहाय्यक ,अरुण काथार हे उपस्थित होते.यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व कर्मचारी तसेच सौ.प्रतिभा सपकाळ, सोनवणे ताई उपकेंद्र नेवपूर, शुभदा कुलकर्णी, निता बावस्कर, नानू पवार, आशा कार्यकर्त्या सौ. निर्मला ताई सनान्से, रेखा वाढेकर, सिंधूताई थोटे, ताई निकम, लक्ष्मी बाई पवार ,सरिता कृष्णा भारती (गणेशपुर), पुजा धरम मेहेर, मर्जिना आशिफ शेख, छाया सुनील जंजाळ, माधुरी डव्हारे, शुभांगी पाटील, शारदा मनगटे, अंगणवाडी कार्यकर्त्या, वाकी, निर्माण नेवपूर, रायगाव, बरकतपूर, वाकद,टाकळी, वाकदवाडी अशा विविध गावातील गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता, आजूबाजूच्या गावातील महिला, व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सर्व महिलांना अळीवचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.प्रतिभा आघार्डे यांनी केले.



# जि. प. शाळेचे इंग्रजी पथनाट्य सर्वप्रथम!

आधुनिक केसरी

**विनोद जैतमहाल**
जालना


सरकारी शाळांच्या इमारती कशाही असोत, शिक्षक आणि विद्यार्थी मात्र वेगाने बदलत आहेत. त्यातच जालना जिल्ह्यातील शेलगाव जिल्हा परिषद शाळेने एक पाऊल पुढे टाकत इंग्रजीतून पथनाट्य सादर केले आणि शिक्षण विभागाच्या सांस्कृतिक स्पर्धेत पहिले बक्षिसही पटकावले. आज एकविसाव्या शतकात महात्मा गांधी अवतरले तर लोक त्यांच्याशी कसे वागतील? जातीधर्मावरून दंगली पेटवणाऱ्यांना एकीचे महत्त्व पटेल का? असे अनेक प्रश्न उपस्थित करणारे 'वुई द पीपल' हे पथनाट्य मी बारा वर्षांपूर्वी लिहिले होते. भारतीय संविधानाची सुरुवात 'वुई द पीपल ऑफ इंडिया' अशी आहे. याच वाक्याचा उपयोग करून शेवटी एक गाणेही या पथनाट्यात आहे. मात्र या पथनाट्याचा एकही प्रयोग झालेला नव्हता. आजच्या पिढीला समजेल अशा सोप्या भाषेत हे पथनाट्य लिहिले आहे. याचे आणखी दोन उद्देश होते. एक तर हे पथनाट्य करणाऱ्या मुलांना इंग्रजी संवादासह नाटक सादर करण्याचा अनुभव मिळावा आणि प्रेक्षक मुलांनाही त्यातून प्रेरणा मिळावी. हे दोन्ही उद्देश 13 सप्टेंबर 2023 रोजी साध्य झाले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त सांस्कृतिक स्पर्धेसाठी या शाळेला एक पथनाट्य सादर करायचे होते. स्पर्धेच्या केवळ तीन दिवस आधी शेलगाव येथील शिक्षक, कलावंत मित्र संतोष दहिवाळ यांनी माझ्याकडून हे पथनाट्य घेतले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्यातले सर्व इंग्रजी संवाद आठवीच्या मुला-मुलींनी एका रात्रीतून पाठ केले. दुसऱ्या दिवशी शिक्षिका सौ. मनिषा पाटील यांनी तालीम घेतली आणि तिसऱ्या दिवशी बदनापूर येथे या पथनाट्याचे सादरीकरण झाले. तेथे या पथनाट्याने पहिला क्रमांक पटकावला. कृतिका लष्करे, सुरभी गाडेकर, तृप्ती अंभोरे, प्राची अंभोरे, पूजा चांगुलपाये, अक्षरा कुलकर्णी, साधना गायकवाड व अनिरुद्ध गाडेकर यांनी अतिशय कमी वेळेत हे पथनाट्य बसवले आणि सादर केले त्याबद्दल त्यांचे कौतुकच करावे लागेल. आपण दोन दिवसांत इंग्रजी नाटक उभे करू शकतो तर आपण जगात काहीही करू शकतो हा आत्मविश्वास विजेत्या संघाच्या चेहऱ्यावर दिसत होता.

बदनापूर तालुक्यातले शेलगाव हे तीन-चार हजार लोकवस्तीचे गाव आहे. येथील बरीचशी मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकतात. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी येथील मुख्याध्यापक प्रकाश औंढेकर, शिक्षिका मनिषा पाटील, जगत घुगे, योगेश मोरे, सुनीता पडूळ, मनीषा बोडले, अरविंद खरात, राजेंद्र कायंदे, विनायक जोशी, अशोक मूर्तरकर, श्रीमती बीडकर हे सर्व जण विद्यार्थ्यांसाठी सतत नव्या उपक्रमांच्या शोधात असतात. येथील शिक्षिका सौ. मनिषा पाटील यांना आजच आदर्श शिक्षिका पुरस्कारही घोषित झाला आहे. इंग्रजीसह जर्मन व अन्य परदेशी भाषाही त्या शिकल्या असून उत्तम वक्तृत्व, सूत्रसंचालन व निवेदन त्या करतात. पुस्तकांच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी येथील सर्वच शिक्षक तत्पर असतात. अशा शिक्षकांच्या तळमळीतूनच आज गावखेड्यांमध्ये नवा भारत घडवला जात आहे. विद्यार्थ्यांना फाडफाड इंग्रजी बोलता यावे म्हणून इंग्रजी माध्यमांच्या शाळा आग्रही असतात तसा मराठी शाळेतील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढावा म्हणून थेट इंग्रजी नाटक करवून घेणारी शेलगाव जिल्हा परिषदेची ही मराठी शाळा निश्चितच अभिनंदनास पात्र आहे. जिल्हा परिषद शाळांचे खासगीकरण करण्यापेक्षा सरकारनेच नीट लक्ष घातले तर अशा अनेक शाळा चांद्रयानासारखी झेप घेतील हे नक्की!

# मोदी पुन्हा सत्तेत येण्यासाठी अथर्वशीर्ष पाठ

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** २०२४ मध्ये पुन्हा मोदी सरकार सत्तेत येण्यासाठी अकोला भाजपच्यावतीने गणपती अथर्वशीर्ष व 'गण गणात बोते, श्री गजानन, जय गजानन' मंत्रजप करण्यात आला. शेतकरी, सर्वसामान्य नागरिक, व्यापारी सुखी-समृद्ध राहून भारत महाशक्तिशाली राष्ट्र निर्माण होण्यासाठी वेदपाठी ब्राह्मणांच्या मंत्रोच्चाराने विशेष प्रार्थना देखील भाजपच्यावतीने करण्यात आली. वेगवेगळ्या माध्यमातून अप्रत्यक्ष प्रचार मोहीम राबवली जात आहे. दरम्यान, संत गजानन महाराज पुण्यतिथी व गणेशोत्सवानिमित्त गणपती अथर्वशीर्ष, नामजप कार्यक्रम भाजपच्या अकोला कार्यालयात घेण्यात आला. पुजेमध्ये २७ जोडपे सहभागी झाले होते. दोन तास विशेष पूजा, मंत्रोच्चार सुरू होते. यावेळी २५१ अथर्वशीर्ष पाठ करण्यात आले. 'गण गणात बोते', 'जय गजानन,श्री गजानन'चा जप करून सप्तऋषींना स्मरण केले. गणेशोत्सवानिमित्त प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, आमदार गोवर्धन शर्मा, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकले, किशोर पाटील, जयंत मसने यांच्या नेतृत्वात वेगवेगळे कार्यक्रम भाजपच्यावतीने घेण्यात येत आहेत.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनच्या वतीने कंत्राटी भरतीच्या जी.आर.ची होळी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासन भरतीसाठी कायम उदासीन आहे वेळोवेळी अनेक स्तरातून मागण्या होऊनसुद्धा, अनेक विभागाच्या जागा रिक्त असूनसुद्धा सरकार भरतीप्रक्रिया राबविण्याची इच्छाशक्ती दाखवत नाही त्यातच राज्य शासनातर्फे सरकारी नोकरी तर लांबच याउलट इथूनपुढे भरती ही कंत्राटी पद्धतीची असेल तिचे स्वरूप म्हणजे खाजगी कंपन्यामार्फत घेण्यात येतील अश्या आशयाचा जी.आर महाराष्ट्र शासनाच्यावतीने काढण्यात आला यामुळे वर्षानुवर्षे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या, मेहनत घेऊन अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रचंड नुकसान होऊन त्यांच्या मनोबलाचे खच्चीकरन होईल म्हणून याचा विरोध करण्यासाठी ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन (AISF) च्या वतीने राज्यभर जी.आर ची होळी खासगीकरणाचा उल्लेख असलेला जी. आर जाळुन निषेध करण्यात आल. सदरील आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर करण्यात आले. या आंदोलनात विशाल बोराडे, उमेश इंगळे, योगेश साळवे, पवन मिसाळ, सम्यक जमधडे, महावीर गायकवाड इत्यादी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# समृद्धी महामार्गावर पोलिसांकडून मार्गदर्शन व जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सावंगी समृद्धी महामार्ग चैनल क्रमांक 418 भारत पेट्रोल पंप येथे रवींद्र कुमार सिंगल अप्पर पोलीस महासंचालक साहेब ( वा ) महाराष्ट्र राज्य मुंबई,मा. श्रीमती अनिता जमादार मॅडम पोलीस अधीक्षक महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, श्रीकांत डिसले साहेब पोलीस उपाधीक्षक महामार्ग पोलीस प्रादेशिक विभाग, औरंगाबाद, गिरी साहेब पोलीस निरीक्षक औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली वाहन चालक व प्रवासी यांना वाहतूक नियमाचे पालन करण्याबाबत प्रबोधन व जनजागृती करुन खालील प्रमाणे वाहतूक नियमाचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.
समृद्धी महामार्गावर प्रवासाला येण्याअगोदर आपल्या वाहनाची संपूर्ण तपासणी करुनच प्रवास करावा.
सीट बेल्ट वापरूनच वाहन चालवावे. महामार्गावरून प्रवास करीत असताना झोप येत असल्यास आपले वाहन सुरक्षित ठिकाणी महामार्गावरील नजीकच्या पेट्रोल पंपावर किंवा इंटरचेंज वरून बाहेर पडुन पुरेशी झोप घ्यावी. मोबाइल वर बोलत तसेच नशापाणी करून वाहन चालवू नये. रस्त्यावरती वन्य प्राणी येतात, त्यामुळे सुद्धा अपघात होतात. याची खबरदारी घ्यावी.
नायट्रोजन गॅस न भरलेले टायर गरम होऊन फुटून अपघात होत आहेत, त्यामुळे कारमध्ये नायट्रोजन गॅस हवा भरून घेणे. 4 व्हीलर गाडी 120 च्या वरती वेगात चालवू नये. रात्रीच्या वेळेस 100 च्या वरती वेगाने चालू नये.
तसेच ट्रक 80 च्या वरती चालू नये. लेन बदलताना मागे पुढे बघून तसेच वेगावर मर्यादा ठेऊन लेन बदलावी. दर एक दोन तासानंतर पेट्रोल पंप तसेच टोल वर वाहन थांबवे.



मुख्य महामार्गावर वाहन थांबवू नये.
कोणतीही मदत लागल्यास समृद्धी महामार्ग कंट्रोल रूम टोल फ्री क्रमांक 8181818155 यावर संपर्क साधावा. असे प्रकाश जाधव पोलिस उपनिरीक्षक म.पो. केंद्र.छ.संभाजीनगर यांनी कळवले व मार्गदर्शन केले.



# दादासाहेब काळे विभागीय अध्यक्षपदी तर राष्ट्रीय संघटकपदी अरुण चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** महाराष्ट्र राज्यासह भारतातील एकूण २१ राज्यात सतत वीस वर्षापेक्षा जास्त काळापासून सर्वसामान्यांच्या हक्कासाठी व स्वातंत्र सैनिकाच्या सन्मानासाठी कार्य करणाऱ्या आणि भ्रष्टाचार निर्मूलनासाठी लढा देणाऱ्या अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या विभागीय अध्यक्षपदी दादासाहेब काळे तर अरुण चव्हाण देशमुख राष्ट्रीय संघटक या पदांवर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांचा लातूर संपन्न झालेल्या १३ व्या अधिवेशनात सन्मानपत्र व नियुक्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला. भारत सरकार दिल्ली नोंदणीकृत अशी व भारतातील स्वातंत्र्य सैनिक मराठवाडा मुक्ती संग्रामातील सैनिक व त्यांचे पाल्य आणि कुटुंब यांच्या हिताचे रक्षण करत त्यांना सामाजिक मदतीसाठी झटणाऱ्या व अपंग निराधार व वृद्धांच्या हक्कांसाठी जवळपास वीस वर्षापासून लढणाऱ्या अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे प्रदीप बाबा पाटील खंडापूरकर यांच्या नेतृत्वाखाली २१ राज्यात कार्यरत अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अरुण चव्हाण देशमुख व दादासाहेब काळे त्यांचे वर्षभरातील कार्य बघून राष्ट्रीय कोर कमिटीने त्यांना अरुण चव्हाण देशमुख यांची प्रदेशाध्यक्ष पदावरून बढती देत राष्ट्रीय संघटक या पदावर नियुक्ती दिली तर पत्रकार दादासाहेब काळे यांना जिल्हाध्यक्ष पदावरून बढती देत विभागीय अध्यक्ष या पदावर नियुक्ती केली छत्रपती संभाजीनगर जालना बीड या तीन जिल्ह्याच्या विभागासाठी विभागीय अध्यक्ष म्हणून पत्रकार दादासाहेब काळे यांची १७ सप्टेंबर रोजी नियुक्ती करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष प्रदिप बाबा पाटील खंडापुरकर, प्रदेश अध्यक्ष पंडीतराव तिडके , राष्ट्रीय संघटक अरुण चव्हाण देशमुख, महिला प्रदेश अध्यक्षा राणी ताई स्वामी यांच्या हस्ते दादासाहेब काळे यांना यापूर्वीच्या कार्यासाठी गौरव पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अजिंक्य काथार, सुरेश बोकील, पत्रकार आजम पठाण, राहुल सोनवणे, मधुकर खमाट, सादिक पठाण, लियाकत भाई, इनुस पठाण , सुरेश बोर्डे, दिलीप गवळी, इजियास पठाण , शिवाजी बनसोड यांच्यासह अनेकांनी काळे व अरुण चव्हाण यांचे अभिनंदन केले.

# अकोला जिल्ह्यात ३०२ ‘एक गाव, एक गणपती’

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** गणरायाचे वाजत-गाजत उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात मंगळवारी आगमन झाले. गणेशोत्सव मंडळांसह भाविकांनी जल्लोषात आपल्या लाडक्या बाप्पाचे स्वागत केले. ‘गणपती बाप्पा मोरया’ च्या जयघोषात गुलाल उधळीत ढोल-ताशाच्या निनादात विघ्नहर्ता बाप्पाचे आगमन झाले. जिल्ह्यात सुमारे १७३२



गणपतींची स्थापना करण्यात आली आहे. त्यामध्ये ३०२ ठिकाणी ‘एक गाव एक’ गणपतीचा समावेश आहे.मांगल्य, पावित्र्य आणि उत्साहाचे प्रतीक असलेल्या गणेशोत्सवाला आनंदात सुरुवात झाली. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या ठिकाणी विविध सामाजिक देखावे साकारण्यात आले. बाप्पाचे आगमन मोठ्या उत्साहात झाल्याने सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले. पर्यावरणपूरक मातीची मूर्ती घेण्याकडे घरगुती गणेशभक्तांचा कल दिसून आला. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी ढोल-ताशा, दिंडीच्या निनादात वाजत गाजत मिरवणूक काढून गणरायाची स्थापना केली. यावर्षी गणेश मंडळात वाढ झाली असून, ग्रामीण भागातही मोठ्या प्रमाणात ‘श्रीं’ची स्थापना करण्यात आली आहे.

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयात शाडूचे गणपती

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील घोडेगाव येथील राजमाता जिजाऊ वरिष्ठ महाविद्यालय, राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय घोडेगाव आणि सद्गुरु जनेश्वर माध्यमिक विद्यालय सार्वजनिक वनिकरण विभाग खुलताबाद यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या या उपक्रमात जवळपास कनिष्ठ महाविद्यालयाच्या 15 व सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय 28 विद्यार्थ्यांनी भाग घेतला. अतिशय सुंदर, कल्पक आणि माती व नैसर्गिक साधनापासून बनवलेले गणपती पहावयास मिळाले. बाजारात उपलब्ध असलेले प्लास्टर ऑफ पॅरिसचे व हानिकारक रंगाचे गणपती तेव्हा पाण्यात विसर्जित केले जातात. त्यावेळेस जलप्रदूषण होते, यावर पर्याय म्हणून मातीचे गणपती ही सुंदर संकल्पना आहे. संस्थापक अध्यक्ष साईनाथ पाटील जाधव साहेब यांच्या संकल्पनेतून, खुलताबाद वनिकरण विभागाचे वनपाल तागड साहेब यांच्या परिश्रमाने पर्यावरण स्नेही गणपती बनवले. राष्ट्रीय हरीत सेना विभागातून राबवल्या गेलेल्या या संकल्पनेत गणपती सोबतच विविध झाडांच्या बिया लावण्यात आल्या. विसर्जन ऐवजी कुंडीत विसरजन केले तर सुंदर रोपट्याची निर्मिती होईल हा त्यामागचा हेतू आहे.

यावेळी प्रशासकिय अधिकारी, प्राचार्य,प्राध्यापक,मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर